दैनिक

अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २४८ । रविवार २१ जून २०२६

। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com




‘सहजयोग’

भाग ८९

## कुंडलिनी जागृती

परमेश्वर सत्य आणि प्रेमाचा स्रोत आहे असे म्हंटलेले आहे. तेव्हा सत्य आणि प्रेम हे दोन्ही एकीकडे एकवटलेलं आहे. अशी शक्ती परमेश्वराची कोणती आहे?. आपण रोजच कितीतरी जिवंत क्रिया पहात असतो. हि फुल आपण बघतो एका लहान बिजा पोटी इतकी सुंदर फुल येतात. एक लहानसं बीज त्याला इतकी सुंदर फुल कशी लागतात?,आपण कधी विचार सुद्धा करत नाही फक्त समजून घेतो कि आहे हि जिवंत क्रिया आहे. पण हि जिवंत क्रिया घडते कशी ?,कोण घडवत ?,तसच प्रत्येक मनुष्याची उंची एका मर्यादेत असते. एखाद्या झाडाची सुध्दा उंची त्याला सुध्दा एक मर्यादा असते. प्रत्येक ऋतू मध्ये वेगवेगळे शेतीचे कार्य होतात. हि सगळी वेगळी कार्य करण्याची कोणती शक्ती आहे? जी हि सबंध कार्याला घडवून आणते. आपण त्या बद्दल विचारही करत नाही. आणि त्यामुळे आपला जो काही प्रगतीचा मार्ग आहे तो फार एकांगी झालेला आहे. जेव्हा आपण विज्ञानाच्या गोष्टी करतो तेव्हा विज्ञान हे फारच एकतर्फी आहे. आणि त्याच्याच मुळे आपल्याला आश्चर्य वाटेल कि परदेशामध्ये आपण समजतो कि भौतिकता खूप वाढलेली आहे,ती सगळी वाढ आहे ती तोलायची क्षमता त्यांच्यात नाही. कारण त्यांचा पाया अध्यात्माचा नाही. तो पाया आपल्या देशात ,विशेषतः आपल्या महाराष्ट्रात अत्यंत भक्कम असा संत लोकांनी मांडलेला आहे. पण नुसतं तोंडानी बोलून काहीही मिळत नाही ,नुसतं वाचन करून काहीही होत नाही. हि काहीतरी अशी विशेष गोष्ट आहे जी आपल्या मध्ये झाली पाहिजे ,ज्यामुळे ह्या मानवी चेतनेच्या पलीकडे हा उंबरठा ओलांडून आपल्याला पलीकडे जायला पाहिजे आणि ती गोष्ट फक्त कुंडलिनीच्या जागृतीने होऊ शकते . १० डिसेंबर १९९०, रयत शिक्षण संस्था,लोणी

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# शासकीय पडीक जमिनी भाडेपट्ट्याने महिला बचत गटांना मिळणार

## महिला सक्षमीकरणासाठी महसूल विभागाचा पुढाकार

- ’राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना’ सुरू
- चारा आणि बांबू लागवडीसाठी केवळ एक रुपयात जमीन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : राज्यातील ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, पशुपालनाला चालना आणि शासकीय जमिनींवरील अतिक्रमणांना आळा या त्रिसूत्रीवर आधारित महत्त्वाचा धोरणात्मक निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने घेतला असून, महसूल विभागाच्यावतीने ‘राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजना’ जाहीर केली.

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून व पुढाकाराने ही योजना सुरू झाली असून, राज्यातील शासकीय पडीक जमिनी नोंदणीकृत महिला बचत गट, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या विधवा महिलांचे बचत गट आणि ’उमेद/माविम’ अंतर्गत येणाऱ्या ग्राम संघांना नाममात्र एक रुपया दराने भाडेपट्ट्याने दिल्या जाणार आहेत.



ग्रामीण भागातील महिलांचे आर्थिक स्वावलंबन आणि पशुधनासाठी चाऱ्याची उपलब्धता या दोन्ही अत्यंत संवेदनशील बाबी आहेत. ’राजमाता जिजाऊ महिला सक्षमीकरण योजने’च्या माध्यमातून देवेंद्र फडणवीस यांचे सरकार महिला बचत गटांना रोजगाराची मोठी संधी देत आहे.

**– चंद्रशेखर बावनकुळे**
**महसूलमंत्री**



या योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील प्रत्येक तालुक्याच्या तहसीलदारांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील गावनिहाय शासकीय जमिनींचा आढावा घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. शासकीय जमिनींवर झालेली खाजगी अतिक्रमणे तात्काळ निष्कासित करून, उपलब्ध जमिनींची अद्ययावत माहिती गाव नमुना क्रमांक एक क’ मध्ये नोंदवून ती जिल्ह्याच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाईल. जिल्हा आणि तालुका पातळीवर समित्या योजनेच्या पारदर्शक अंमलबजावणीसाठी जिल्हा स्तरावर जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली, तर तालुका स्तरावर महसूल मंत्र्यांकडून नियुक्त अध्यक्ष व सहअध्यक्षांच्या (महिला) उपस्थितीत विशेष समित्या काम पाहणार आहेत. तालुका स्तरावर तहसीलदार हे सदस्य सचिव म्हणून काम पाहतील आणि इच्छुक पात्र बचत गटांकडून अर्ज मंजूर करून घेतील.

### कोणत्या जमिनी मिळणार भाडेतत्त्वावर?

- ७/१२ वर ’महाराष्ट्र शासन’ किंवा ’शासकीय मुलकीपड/आकारीपड’ नोंद असलेल्या जमिनी.
- प्रकल्पासाठी संपादित झालेल्या मात्र सध्या पडीक असलेल्या जमिनी
- शेती महामंडळाच्या पडीक जमिनी आणि ग्रामसभेच्या परवानगीने गायरान जमिनी.
- गाळपेर जमिनी, पुनर्वसनासाठीच्या जमिनी आणि सिडको, एमएमआरडीए सारख्या विशेष प्राधिकरणांच्या हद्दीतील जमिनी या योजनेतून वगळण्यात आल्या आहेत.

### बचत गटांसाठी महत्त्वाच्या अटी व पात्रता

- महिला बचत गट किंवा ग्रामसंघ ’उमेद अभियानांतर्गत नोंदणीकृत असावा.
- बचत गटाची नोंदणी किमान ३ वर्षांपूर्वी झालेली असावी आणि बँक खाते किमान १ वर्ष सक्रिय असावे.
- वार्षिक उलाढाल किमान ५० हजार रुपये असणे आवश्यक आहे.
- १० महिला सदस्य असलेल्या गटाला १ हेक्टर, २० सदस्य असलेल्या संस्थेला २ हेक्टर आणि ग्रामसंघासाठी ५ हेक्टरपर्यंत जमीन दिली जाईल.

# सहकारी साखर उद्योगाला आधार देण्यासाठी ३ हजार कोटींचे प्रकल्प : अमित शहा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हापूर :** महाराष्ट्रातील सहकारी साखर उद्योगाला आधार देण्यासाठी इथेनॉलसह अन्य उप उत्पादने बनविण्यासाठी कोल्हापूर जिल्ह्यात तसेच अशा उत्पादनांसाठी लागणार्या यंत्रसामग्री निर्मितीसाठी पुणे येथे असे प्रत्येकी १५०० कोटी रुपये खर्चाचे दोन प्रकल्प राबविले जाणार आहेत. ३ हजार कोटी रुपये गुंतवणूकीच्या या दोन्ही प्रकल्पातून राज्यातील सहकारी साखर कारखान्यांना मोठी ताकद मिळेल, असा विश्वास केंद्रीय गृह तथा सहकार मंत्री अमित शहा यांनी व्यक्त केला.



इचलकरंजी येथे कल्लाप्पाण्णा आवाडे टेक्स्टाईल पार्कच्या मैदानावर भाजपा-महायुतीची विराट जाहीर सभा झाली. त्याप्रसंगी शहा बोलत होते. प्रारंभी कल्लाप्पाण्णा आवाडे इचलकरंजी जनता सहकारी बँकेच्या नूतन प्रशासकीय कार्यालयाचे उद्घाटन तसेच हुपरी येथील जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखान्याचा कल्लाप्पाण्णा आवाडे जवाहर शेतकरी सहकारी साखर कारखाना असा नामविस्तार शहा यांच्या हस्ते झाले. यावेळी माजी खासदार कल्लाप्पाण्णा आवाडे, माजी वस्त्रोद्योग मंत्री प्रकाश आवाडे, बँकेचे अध्यक्ष स्वप्निल आवाडे, प्रकाश दत्तवाडे आदी उपस्थित होते.

व्यासपीठावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर, उच्च व तंत्रशिक्षण चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले, नगर विकास राज्यमंत्री तथा कोल्हापूरच्या सहपालकमंत्री माधुरी मिसाळ, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, माजी मंत्री रवींद्र चव्हाण खासदार धनंजय महाडिक, धैर्यशील माने, आमदार र राजेंद्र पाटील-यड्रावकर, अशोक माने, शिवाजी पाटील, निरंजन डावखरे उपस्थित होते.

अमित शहा यांच्या दौऱ्यापूर्वी ते साखर आणि बँकिंग क्षेत्रातील प्रतिनिधींशी चर्चा करून महत्वाचे निर्णय घोषित करतील असे सांगण्यात आले होते. वेळेअभावी या दोन्ही बैठका झाल्या नाहीत. पण अमित शहा यांनी साखर उद्योगाविषयी भाष्य केले. सध्या साखर उद्योग अडचणीत असल्याच्या चर्चेचा संदर्भ घेत शहा यांनी सहकारी **(पान ४ वर)**

## महत्वाचे..

### प्रधानमंत्री किसान सन्मान निधी : ९०.८५ लाख शेतकऱ्यांना १,८१७ कोटी रक्कम जमा

मुंबई : प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पीएम किसान) योजनेचा २३ वा हप्ता माननीय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी साहेब यांच्या हस्ते आज पश्चिम बंगालमधील हुगळी जिल्ह्यातील तारकेश्वर येथून वितरित करण्यात आला. राज्यातील ९०.८५ लाख शेतकरी कुटुंबांच्या खात्यात सुमारे ₹१,८१७ कोटी रक्कम जमा करण्यात आली असल्याची माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. मुंबई येथून कृषी मंत्री दत्तात्रय भरणे दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून या कार्यक्रमात सहभागी झाले होते. केंद्र शासनाने शेतकऱ्यांना निश्चित उत्पन्नाचा आधार देण्यासाठी फेब्रुवारी २०१९ पासून प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबांना दरवर्षी ₹६,००० इतकी आर्थिक मदत तीन समान हप्त्यांमध्ये थेट त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यात जमा केली जाते.

## ओमराजे निंबाळकरांना धक्का...

# पवनराजे खटल्यातील पद्मसिंह पाटलांसह सर्व आरोपी निर्दोष

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री





**धाराशिव :** महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळाला हादरवून सोडणाऱ्या आणि गेल्या दोन दशलकांपासून प्रलंबित असलेल्या बहुचर्चित पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांड प्रकरणाचा अखेर शनिवारी (२० जून २०२६) अंतिम निकाल लागला. या खटल्याचा संपूर्ण पाया ज्या माफीच्या साक्षीदारावर उभा होता, त्याची साक्ष पूर्णपणे अविश्वसनीय, संशयास्पद आणि विसंगत ठरल्याचे स्पष्ट करत न्यायालयाने माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आरोपींची संशयाचा फायदा देऊन निर्दोष मुक्तता केली आहे. हा निकाल खासदार ओमराजे निंबाळकर आणि निंबाळकर कुटुंबासाठी मोठा कायदेशीर धक्का मानला जात आहे.

सीबीआय विशेष न्यायालयाचे न्यायमूर्ती एस. आर. नावंदर यांच्या कोर्ट क्र. ५५ मध्ये ही ऐतिहासिक सुनावणी पार पडली. बिहारच्या तुरुंगात असलेला मुख्य शूटर पिंटू सिंग याला पोलिसांनी उशिरा हजर केल्यामुळे काही काळ सस्पेन्स वाढला होता. तो न्यायालयात हजर होण्याआधीच कडेकोट पोलीस बंदोबस्तात न्यायालयाने निकालवाचनाला सुरुवात केली. न्यायाधीश एस. आर. नावंदर यांनी निकालपत्राचे वाचन करताना तपास यंत्रणांच्या ढिसाळ कारभारावर आणि पोलिसांच्या चुकांवर अत्यंत गंभीर बोट ठेवले. न्यायाधीशांचे सविस्तर निकालवाचन खालीलप्रमाणे होते. २० वर्षांनंतर मी हा निकाल देतोय, ही अत्यंत दुर्दैवी घटना आहे की एका लोकनेत्याची अशा प्रकारे कळंबोली येथे गोळीबार करून हत्या होते. सुरुवातीला कळंबोली पोलीस, नंतर नवी मुंबई गुन्हे शाखा आणि अखेर सीबीआयकडे हा तपास गेला. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशाने खटला या कोर्टात आला. या प्रकरणात १२७ साक्षीदार तपासले गेले. न्यायालय केवळ कायद्याच्या चौकटीत राहूनच हा निकाल देत आहे.

न्यायालयाने म्हटले की, हा खटला पूर्णपणे माफीचा साक्षीदार पारसमल जैन याच्या साक्षीवर उभा आहे. जैनच्या म्हणण्यानुसार गुन्हे शाखेने त्याला ८ सप्टेंबर २००९ रोजी मुंब्रा येथून ताब्यात घेतले, मात्र त्याला **(पान ४ वर)**

# काळ्या बाजारात विक्रीला जाणारा रेशनचा गहू, तांदूळ पकडला

## २२५ गोण्यासह १२ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी / झरेकाठी :** रेशनचा तांदूळ विनापरवाना बेकायदेशीररित्या काळ्या बाजारात विकण्यासाठी नेण्याच्या उद्देशाने साठवून ठेवलेला असताना पोलिसांनी छापा टाकून सात्रळ येथे २२५ गोण्या गहू, तांदूळसह १२ लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अहिल्यानगर एलसीबीचे पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे यांना माहिती मिळाली की, सोनगाव, सात्रळ शिवारात एकाने रेशनचा गहू, तांदूळ एका पत्र्याच्या गोडाउनमध्ये साठवून



ठेवला आहेत. त्यानंतर पोलीस पथकाने मिळालेल्या माहितीवरून सात्रळ, सोनगाव येथे संबंधित ठिकाणी जावून पाहणी केली असता, तेथे एक इसम बसलेला दिसला. त्यानंतर त्याठिकाणी असलेल्या संबंधित गोडाउनची झडती घेतली असता, त्यात गोण्यामध्ये तांदूळ व गहू आढळून आला, तसेच दोन मालवाहतूक वाहनेही आढळून आली. रेशनिंग आजूबाजूच्या दुकानांमधून काळ्या बाजाराने हा गहू व तांदूळ खरेदी केल्याचे सांगण्यात आले. सदरचे तांदूळ व गव्हाबाबत बिले आढळून आले नाहीत. याठिकाणी २ लाख ९ हजार ७०० रूपयांचा गहू त्यात १२१ गोण्या तसेच ५० कि. च्या ७४ गोण्या आणि २ लाख ९३ हजार रूपयांच्या १३४ गोण्या तांदूळ तसेच ३ लाख आणि ४ लाख रूपयांचे दोन टाटा छोटा हत्ती टेम्पो असा एकूण १२ लाख २ हजार ७०० रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पोलिसांनी यासीर सादीक तांबोळी, (रा. सोनगाव, सात्रळ ता. राहुरी) यांच्याविरुद्ध राहुरी पोलिसात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.




PATANJALI

पतंजलि



आंतरराष्ट्रीय योग दिवस

योग कॉल

मुळात, आपल्या सर्व भारतीयांचे पूर्वज योगी होते, जरी काळाच्या ओघात ते आता विविध पंथ, जाती, वर्ग आणि समुदायांच्या रूपात दिसून येतात. म्हणून, आपल्या पूर्वजांप्रति कृतज्ञता बाळगा आणि कृतघ्नतेचे पाप टाळा. १0, २0, ५0 किंवा १00 लोकांना सामूहिकरित्या योगाभ्यास करण्यास प्रोत्साहित करा आणि त्याचे फोटो व व्हिडिओ सोशल मीडियावर शेअर करा. प्रत्येक गाव, शहर, गल्ली आणि परिसरात छोटे योग कार्यक्रम आयोजित करा.

योग, आयुर्वेद आणि स्वदेशीच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारतासाठी प्रतिज्ञा घ्या आणि इतरांनाही ती घेण्यास प्रवृत्त करा.

निषेध: अनेक आसुरी शक्ती योग, आयुर्वेद, स्वदेशी आणि सनातन संस्कृतीला कटकारस्थानाने विरोध करून नष्ट करण्याच्या कामात गुंतल्या आहेत. राष्ट्रवादी खऱ्या सनातनी आत्म्यांनी या देवसुर संग्राम, धर्मयुद्धात पतंजली आणि पूज्य स्वामी रामदेवजींना पूर्ण ताकदीने १00% पाठिंबा दिला पाहिजे. जिथे धर्म आहे, तिथे विजय आहे आणि सत्याचा विजय होतो.

लूट – जर तुम्ही ऑक्सफॅम इंटरनॅशनलच्या कोणत्याही एआय टूलने शोध घेतला, तर तुमच्या लक्षात येईल की केवळ गेल्या २00-२५0 वर्षांतच परदेशी कंपन्यांनी देशाच्या अर्थव्यवस्थेची १00 ट्रिलियनहून अधिकची लूट केली आहे. महान भारताला बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या आर्थिक गुलामगिरीत, मॅकॉलेच्या शिक्षणाच्या गुलामगिरीत आणि वैचारिक व सांस्कृतिक गुलामगिरीत ढकलण्यात आले, ज्यामुळे देश अधोगतीच्या शिखरावर पोहोचला. चला, आपण सर्वजण ५00-१000 वर्षांपूर्वीच्या सुवर्णयुगाच्या गौरवशाली स्मृतीसह एक महान, विकसित भारत घडवण्यासाठी अविचल आणि तीव्र प्रयत्न करण्याचा संकल्प करूया, जेणेकरून आपण भारताच्या शत्रू शक्तींचा पराभव करू शकू आणि आपल्या पूर्वजांच्या, ऋषीमुनींच्या, संतांच्या आणि हुतात्म्यांच्या स्वप्नातील भारताची उभारणी करू शकू.

पतंजली यांचे योगदान – पतंजली आदरणीय योगऋषी स्वामी रामदेव जी आणि आदरणीय आचार्य श्री बाळकृष्ण जी अथक प्रयत्नांतून योग, आयुर्वेद, स्वदेशी आणि सनातन संस्कृतीचा सर्वांगीण गौरव संपूर्ण जगात पोहोचला आहे. हरिद्वारपासून देश आणि जगापर्यंत, पतंजलीने या उदात्त सेवेत लाखो-कोटी रुपयांचे दान केले आहे. सुमारे १0,000 संशोधन प्रोटोकॉलनुसार, ५00 हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहेत. पतंजली गुरुकुलम, आचार्यकुलम, पतंजली विद्यापीठ, भारतीय शिक्षक मंडळ (बीएसबी), पतंजली करिअर अकादमी, पतंजली नागरी सेवा अकादमी (पीसीएसए), पतंजली वेलनेस, योगग्राम, निरामयम, पतंजली रिसर्च फाउंडेशन, गोशाळा आणि पतंजलीच्या देशव्यापी संघटनांमधील लाखो कार्यकर्त्यांच्या निःस्वार्थ सेवेतून आणि समर्पणातून एक कालातीत, ऐतिहासिक सेवा सुरू आहे. शेकडो संन्याशांची तपश्चर्या, लाखो कर्मयोगी बंधू-भगिनींची निःस्वार्थ सेवा आणि तुम्हा सर्वांचे, माझ्या देशवासियांनो, आशीर्वाद हाच आमचा एकमेव आधार आहे, आणि आम्ही आमच्या अखेरच्या श्वासापर्यंत भारतमातेच्या आणि मानवतेच्या सेवेसाठी आमचे सर्वस्व समर्पित करण्याचा संकल्प करतो.

पतंजलीमध्ये सामील व्हा आणि आमच्या सेवांचा लाभ घ्या. योग, राम, कृष्ण आणि शिव यांच्या गुणांना आपल्या स्वभावात आणि आचरणात अंगीकारा. कारण सनातन धर्म हा केवळ उपदेश नसून, तो आपल्या आचरणाचा विषय आहे.

आस्था चॅनल, इंडिया टीव्ही किंवा यूट्यूब इत्यादींशी जोडून दररोज योगाभ्यास करा.

आस्था LIVE – दररोज सकाळी ५:०० ते ७:३० आणि रात्री ८:०० पर्यंत | संस्कार – दररोज रात्री ९:०० वाजता | INDIA TV – दररोज सकाळी ८:०० वाजता | YouTube – Swami Ramdev | Acharya Bal Krishna

पतंजलीची आरोग्यदायी उत्पादने खरेदी करण्यासाठी आणि संशोधन व पुराव्यांवर आधारित औषधोपचाराने रोगांचे निर्मूलन करण्यासाठी, गुगलवर माझ्या जवळचे पतंजली स्टोअर (Patanjali Store Near Me) असे शोधा. पतंजलीची सर्व स्वदेशी उत्पादने, जसे की गाईचे तूप, दंत कांती, मध, केश कांती, सरबत आणि ज्यूस, देशभरातील सर्व प्रमुख दुकानांमध्ये उपलब्ध आहेत. जिथे ही उत्पादने उपलब्ध नाहीत, तिथे दुकानदाराला पतंजलीची उत्पादने दुकानात ठेवण्याची विनंती करा.

सर्व प्रमुख पतंजली संस्थांच्या वेबसाइटला भेट देऊन अधिक माहिती मिळवा.पतंजली वेलनेसमध्ये या आणि आरोग्याचे फायदे मिळवा.

स्वामी रामदेव । आचार्य बाळ कृष्ण नोंदणीसाठी संपर्क– 8954-666-111

भारतीय शिक्षण मंडळ आणि पतंजली नागरी सेवा अकादमी यांच्याशी संपर्क साधा– 8954-555-999

# पवनराजे खटल्याचा निकाल : संशय, सत्तासंघर्ष आणि न्यायव्यवस्थेचे प्रश्न

**विशेष संपादकीय**
करण नवले
संपादक

महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील सर्वाधिक गाजलेल्या आणि भावनिकदृष्ट्या संवेदनशील अशा पवनराजे निंबाळकर दुहेरी हत्याकांडाचा निकाल अखेर तब्बल वीस वर्षांनंतर लागला. सीबीआय विशेष न्यायालयाने माजी गृहमंत्री डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यासह सर्व आठ आरोपींना संशयाचा फायदा देत निर्दोष मुक्त केले. न्यायालयाने कोणत्याही आरोपीला निरपराध ठरवलेले नाही; मात्र दोष सिद्ध करण्यासाठी आवश्यक असलेले सबळ, विश्वासार्ह आणि निर्विवाद पुरावे सरकारी पक्ष सादर करण्यात अपयशी ठरल्याचे स्पष्ट केले आहे. त्यामुळे हा निकाल केवळ एका खटल्याचा शेवट नसून, आपल्या तपास यंत्रणा, न्यायप्रक्रिया आणि राजकीय संस्कृतीवर गंभीर प्रश्न उपस्थित करणारा आहे.

२००६ मध्ये कळंबोली येथे पवनराजे निंबाळकर आणि त्यांचे चालक समद काझी यांची भररस्त्यात गोळ्या झाडून हत्या करण्यात आली होती. धाराशिव जिल्ह्याच्या राजकारणात पवनराजे आणि पद्मसिंह पाटील यांच्यातील संघर्ष हा केवळ वैयक्तिक नव्हता, तर तो दोन राजकीय प्रवाहांतील संघर्षाचे प्रतीक बनला होता. त्यामुळे या हत्येचे राजकीय पडसाद राज्यभर उमटले. तपास स्थानिक पोलिसांकडून नवी मुंबई गुन्हे शाखेकडे आणि नंतर सीबीआयकडे गेला. अनेक वर्षांच्या सुनावण्या, बदलणारे सरकारी वकील, न्यायालयीन हस्तांतरे आणि कायदेशीर लढाईनंतर अखेर हा निकाल समोर आला.

या खटल्यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे न्यायालयाने माफीच्या साक्षीदार पारसमल जैन यांची साक्ष पूर्णपणे अविश्वसनीय ठरवली. संपूर्ण खटल्याचा पाया ज्यांच्या साक्षीवर उभा होता, त्याच साक्षीदाराने वेळोवेळी परस्परविरोधी विधाने केली. एका घटनेबाबत चार वेगवेगळ्या कथा सांगितल्या. पैशांसाठी गुन्हा केल्याचा दावा केला, परंतु त्याचवेळी त्यांची आर्थिक परिस्थिती सुदृढ असल्याचे पुरावे समोर आले. पोलिसांकडून मारहाण, धमक्या आणि बेकायदेशीर ताब्यात ठेवल्याचे आरोपही त्यांनी केले. परिणामी न्यायालयाने त्यांच्या साक्षीकडे संशयाने पाहिले आणि सरकारी पक्षाचा मुख्य आधारच कोसळला.

याहून गंभीर बाब म्हणजे न्यायालयाने तपास यंत्रणांच्या कार्यपद्धतीवर व्यक्त केलेली नाराजी. मोबाईल फोन जप्त न करणे, कॉल डिटेल रेकॉर्ड न काढणे, आर्थिक व्यवहारांची खातरजमा न करणे, घटनास्थळावरील अनेक विसंगती, जप्ती पंचनाम्यातील त्रुटी आणि साक्षीदारांच्या जबाबातील तफावत यामुळे तपासाची विश्वासार्हता कमकुवत झाली. आधुनिक गुन्हे तपासात डिजिटल पुरावे हा कणा मानला जातो. मात्र इतक्या मोठ्या कटकारस्थानाच्या प्रकरणात मोबाईल पुरावेच उपलब्ध नसणे ही धक्कादायक बाब आहे.

हा निकाल ओमराजे निंबाळकर आणि निंबाळकर कुटुंबासाठी निश्चितच मोठा धक्का आहे. कारण गेली दोन दशके त्यांनी न्यायासाठी लढा दिला. पवनराजेंची हत्या ही केवळ एका व्यक्तीची हत्या नव्हती; ती एका राजकीय नेतृत्वाच्या उदयाला रोखण्याचा प्रयत्न असल्याचा आरोप सातत्याने केला गेला. त्यामुळे न्यायालयीन प्रक्रियेनंतरही भावनिक आणि राजकीय स्तरावर हा संघर्ष संपेल असे मानणे कठीण आहे. न्यायालयाने आरोपींना निर्दोष मुक्त केले असले तरी पवनराजेंची हत्या कोणी केली, याचे समाधानकारक उत्तर आजही समाजासमोर आलेले नाही.

राजकीयदृष्ट्या या निकालाचे परिणामही दूरगामी असू शकतात. पद्मसिंह पाटील यांच्या समर्थकांसाठी हा मोठा दिलासा आणि नैतिक विजय म्हणून मांडला जाईल. दुसरीकडे, विरोधी गट हा निकाल तपास यंत्रणांच्या अपयशाचे उदाहरण म्हणून पुढे करेल. त्यामुळे न्यायालयीन निकालाने कायदेशीर वाद संपला असला, तरी राजकीय वाद अधिक तीव्र होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

या प्रकरणातून आणखी एक महत्त्वाचा प्रश्न समोर येतो. भारतातील न्यायप्रक्रिया इतकी संथ का आहे? एखाद्या दुहेरी हत्येच्या खटल्याचा निकाल लागण्यासाठी वीस वर्षे लागतात, अनेक साक्षीदार बदलतात, आठवणी धूसर होतात, पुरावे कमकुवत होतात आणि शेवटी सत्य शोधण्याची प्रक्रिया अधिक कठीण बनते. न्याय उशिरा मिळणे म्हणजे न्याय नाकारल्यासारखेच असते, ही उक्ती अशा प्रकरणांमध्ये अधिक प्रकर्षाने जाणवते.

न्यायालयाचा निकाल हा भावनांवर नव्हे तर पुराव्यांवर आधारित असतो. लोकांच्या मनात कोणाबद्दलही कितीही संशय असला तरी न्यायालयाला दोष सिद्ध करण्यासाठी कायद्याने अपेक्षित दर्जाचे पुरावे आवश्यक असतात. पवनराजे खटल्यात तो निकष पूर्ण झाला नाही, हे न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले आहे. त्यामुळे या निकालाचा खरा अर्थ आरोपी निर्दोष आहेत एवढाच नसून, तपास यंत्रणा दोष सिद्ध करण्यात अपयशी ठरल्या हा आहे.

पवनराजे निंबाळकर यांच्या हत्येचे गूढ आणि त्याभोवतीचे राजकारण महाराष्ट्राच्या स्मरणातून सहज पुसले जाणार नाही. न्यायालयात शेवटी पुरावेच बोलतात. जेव्हा तपासातील त्रुटी पुराव्यांवर मात करतात, तेव्हा सत्याचा शोध अधांतरी राहतो. पवनराजे खटल्याचा निकाल हा न्यायव्यवस्थेचा विजय आहे की तपास यंत्रणांच्या अपयशाची कबुली, याचा विचार आता समाजाने आणि सत्ताधाऱ्यांनी गांभीर्याने करण्याची गरज आहे.

# कृषीकन्यांकडून सोमेश्वर शाळा आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री


शाळेतील विद्यार्थ्यांना योगासनांची (छाया, देविदास चौरे)

**चांदा :** मुळा एज्युकेशन सोसायटी चे कृषी महा विद्यालय सोनईच्या कृषीकन्यांकडून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोमेश्वर, क्लास चारीन सात चांदा येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळेचे मुख्याध्यापक अशोक झावरे यांनी भूषविले.

कार्यक्रमाची सुरुवात प्रार्थने करण्यात आली. कृषीकन्या प्रेरणा चंदनशिव, ऋतुजा जानराव, साक्षी आरु, साक्षी गरूड, श्रावणी जाधव, वैष्णवी आहिरे यांनी विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व पटवून देत ताडासन, वृक्षासन, भुजंगासन, त्रिकोणासन, वज्रासन यांसारखी विविध योगासने प्रात्यक्षिकासह करून दाखवली. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग नोंदवत योगासने केली.

वर्गशिक्षिका शीतल काळे यांनी योगाचे शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी असले फायदे स्पष्ट केले. त्यांनी विद्यार्थ्यांना नियमित योग करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी एकत्रितपणे योग दिनाची शपथ घेतली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कृषीकन्या, शिक्षक व शाळेतील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.प्राचार्य डॉ हरी मोरे, उपप्राचार्य सुनिल बोरुडे, कार्यक्रम समन्वयक अनुप दरंदले, कार्यक्रम अधिकारी डॉ दिशा चव्हाण, डॉ संतोष चौगुले, प्रा नरेंद्र दहातोंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम राबविण्यात आला.

# देवळाली प्रवरा येथील मनोरुग्ण महिला बेपत्ता

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** तालुक्यातील देवळाली प्रवरा परिसरातील शेटेवाडी येथिल सौ. रेणूका गंगाधर खांदे, वय ३५ वर्षे, ही विवाहित महिला कोणाला काही न सांगता अचानकपणे बुधवार दि. १७ जून रोजी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास घरातून निघून गेली आहे.

सदर महिला मनोरुग्ण असून तिच्यावर वैद्यकीय उपचार सुरु आहेत. सदर महीला रंगाने गोरी असून सडपातळ बांधा आहे. उंची ५ फुट ५ इंच आहे. या बाबत राहुरी पोलिस ठाण्यात मिसिंग दाखल करण्यात आलेली आहे. सदर महिला कोणाला आढळून आल्यास राहुरी पोलिस स्टेशनला संपर्क क्रमांक ०२४२६ - २३२४३३ या नंबरवर करावा. असे अवाहन राहुरी पोलिसांनी केले आहे.

# जरांगे पाटील यांच्या भावना शासनापर्यंत पोहोचल्या : मंत्री विखे पाटील

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी :** मराठा समाजाच्या प्रलंबित मागण्यांसंदर्भात आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केलेल्या भावना शासनाने गांभीर्याने घेतल्या असून त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक भूमिका कायम असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगरचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

लोणी येथे पत्रकारांशी संवाद साधताना मंत्री विखे पाटील यांनी मराठा आरक्षण व अन्य मागण्यांबाबत शासनाची भूमिका स्पष्ट केली. आमदार लाड यांनी आंतरवाली येथे जाऊन मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतली असून त्या भेटीदरम्यान मराठा समाजाच्या विविध मागण्यांवर चर्चा झाल्याचे त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली शासनाने अनेक निर्णय घेतले असून त्यापैकी बरेच प्रश्न मार्गी लागल्याचे विखे पाटील म्हणाले. काही निर्णयांची अंमलबजावणी करण्यापूर्वी त्यांच्या कायदेशीर वैधतेची पडताळणी करणे आवश्यक असल्याने त्यानुसार पुढील कार्यवाही केली जात आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

मराठा समाजासंदर्भातील ५८ लाख नोंदींचा डेटा उपलब्ध करून देण्यात आला असून हा डेटा केवळ संभाजीनगर विभागाचा नसून राज्यातील सहा महसूल विभागांचा असल्याचे त्यांनी सांगितले. यासंदर्भात विभागीय आयुक्तांना आवश्यक सूचना देण्यात आल्याचेही त्यांनी नमूद केले.

जरांगे पाटील यांनी निर्णयांची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली आहे. त्यात काहीही चुकीचे नाही. त्यांच्या सूचनांचा आम्ही नेहमीच आदर केला आहे. शासनाच्या वतीने या विषयात लवकरात लवकर योग्य ती कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला जाईल, असेही मंत्री विखे पाटील यांनी यावेळी सांगितले.

# निरोगी आणि संतुलित जीवनासाठी योग आवश्यक : शेळके



प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** भाग्योदय माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण व शिस्तबद्ध वातावरणात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांसह शिक्षकवृंद, योगप्रेमी नागरिक आणि मान्यवरांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. योगाचे महत्त्व, त्याचे आरोग्यदायी फायदे आणि विद्यार्थ्यांच्या जीवनातील उपयुक्तता याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य ज्ञानदेव बेरड होते, तर उद्योजक राजेंद्र शेळके हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. याशिवाय योगशिक्षक डॉ. गोविंद कदम, प्रा. एकनाथ होले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना उद्योजक राजेंद्र शेळके म्हणाले की, योग ही आजच्या काळातील जीवनदायी गरज असून शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल राखण्यासाठी योग अत्यंत महत्त्वाचा आहे. नियमित योगाभ्यासामुळे विद्यार्थ्यांची एकाग्रता वाढते, स्मरणशक्ती सुधारते तसेच मानसिक विकासाला चालना मिळते. किरकोळ आजारांपासून संरक्षण मिळवण्यासाठी आणि शरीर सुदृढ ठेवण्यासाठी योगाचा दैनंदिन जीवनात समावेश करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक योग शिक्षक डॉ. गोविंद कदम यांनी केले. त्यांनी पतंजलींच्या अष्टांग योगाचे महत्त्व विशद करताना समाजात वाढत चाललेली अस्वस्थता, चिडचिड आणि तणाव यावर योग हे प्रभावी उत्तर असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्ता विकासासाठी प्राणायाम आणि ध्यानाचे नियमित प्रशिक्षण आवश्यक असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. यानंतर प्रा. एकनाथ होले यांनी विद्यार्थ्यांसमोर विविध योगासनांची प्रात्यक्षिके सादर केली. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने सहभाग घेत शिस्तबद्ध पद्धतीने योगासने सादर केली. कार्यक्रमास रेणुकामाता विद्यालयाचे मुख्याध्यापक बन्सी नरवडे, बाबासाहेब कोतकर, सोपान तोडमल, धनंजय बारगळ, शिवाजी धस, आदिनाथ ठुबे, संतोष काकडे, रूपाली शिंदे, संगीता मेढे, पद्मजा केरुलकर, सुनीता कोरडे, कनिष्ठ विद्यालयातील गोरक्ष कांडेकर, दत्तात्रय पांडुळे, गणेश गायकवाड, वैष्णवी जगताप, बाळासाहेब कावरे, सुधाकर गायकवाड आदी उपस्थित होते.




# नेवासा प्रेस क्लबच्या वतीने पो. नि. प्रताप दराडे यांचा सन्मान

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** नेवासा पोलीस स्टेशनला नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचा नेवासा प्रेस क्लबच्या वतीने स्वागत करत सन्मान करण्यात आला.

यावेळी नेवासा प्रेस क्लबचे अध्यक्ष गुरुप्रसाद देशपांडे,कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण,उपाध्यक्ष कैलास शिंदे,अशोक डहाळे,रमेश शिंदे,नाना पवार,मकरंद देशपांडे, सुहास पठाडे,मोहन गायकवाड,शंकर नाबदे,पवन गरूड आदी उपस्थित होते. उपस्थित पत्रकारांशी संवाद साधत पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी विविध विषयावर चर्चा केली कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य पत्रकारांनी करावे त्यासाठी आपण खमकी भूमिका घेऊ अशी ग्वाही यावेळी बोलतांना दिली.

# प्रा. नानासाहेब तळेकर यांचा सेवापूर्ती कृतज्ञता सोहळा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी :** वार्ताहर प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक परिवारात दीर्घकाळ उल्लेखनीय सेवा बजावणारे प्रवरा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वरवंडीचे कर्तव्यदक्ष प्राचार्य नानासाहेब देवराम तळेकर यांच्या सेवापूर्तीनिमित्त कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन रविवार, २१ जून २०२६ रोजी करण्यात आले आहे.

हा सोहळा सकाळी १०.३० वाजता आश्वी बुद्रुक येथील साई लॉन्स मंगल कार्यालय, ता. संगमनेर येथे संपन्न होणार आहे. कार्यक्रमात शालिनीताई राधाकृष्ण विखे यांच्या हस्ते प्राचार्य तळेकर यांचा सत्कार करण्यात येणार आहे. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, डॉ. सुजय विखे, आ. अमोल खताळ तसेच रामेश्वर देवस्थान वरवंडीचे मठाधिपती ह.भ.प. दत्तगिरी महाराज उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद सदस्य आण्णासाहेब भोसले राहणार असून परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.



# गटकळ स्कूलमध्ये योग दिवस

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** लेट एकनाथ नामदेव गटकळ इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज मध्ये संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ड भाऊसाहेब टेमक साहेब व ड सुरेखा टेमक यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक योगा दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. धावपळीच्या युगामध्ये शारीरिक तंदुरुस्ती खूप महत्त्वाची असून शरीर मजबूत असेल तरच आपण चांगले जीवन जगू शकतो त्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये जागृती व्हावी म्हणून आंतरराष्ट्रीय योग दिवस शाळेमध्ये साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष योगासन सादर केली. शाळेच्या प्राचार्या भारती कुदळे यांनी योगासनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमाचे कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्राचार्य सुपरवायझर वर्षा मगर व माधुरी गटकळ तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुतिका खवले यांनी केले व आभार प्रदर्शन पुनम वरपे यांनी केले.

# ईश्वरी गागरे एमएचटी-सीईटीमध्ये राज्यात अव्वल

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** शेतकरी कुटुंबातील अहिल्यानगरची कन्या ईश्वरी सुरेश गागरे हिने एमएचटी-सीईटी २०२६ परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवले आहे. ईश्वरीने मुलींच्या गटात राज्यात अव्वल क्रमांक पटकावत संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष वेधून घेतले आहे. तसेच मुला-मुलींच्या एकत्रित गुणवत्तायादीत अहिल्यानगर जिल्ह्यात प्रथम येण्याचा बहुमानही तिने मिळवला आहे.

वनकुटे येथील ईश्वरीने प्रतिकूल परिस्थितीतही शिक्षणाची कास धरत सातत्यपूर्ण परिश्रम, चिकाटी आणि आत्मविश्वासाच्या बळावर हे यश संपादन केले आहे. तिने १०० परसेंटाइल गुण मिळवून तिच्या या यशामुळे केवळ तिच्या कुटुंबाचाच नव्हे तर संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्याचा गौरव वाढला आहे. ईश्वरीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल आमदार काशिनाथ दाते यांनी तिचे विशेष अभिनंदन केले.

# विमा व गुंतवणुकीवर कार्यशाळा




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुरी येथील गाडगे बाबा जेष्ठ नागरिक हॉल येथे ऋणानुबंध इन्शुरन्स व इन्व्हेस्टमेंट यांच्या वतीने आजच्या धकाधकीच्या जीवनात आपल्या भविष्यासाठी शेअर मार्केट म्युच्युअल फंड विमा व गुंतवणुकी आदी विषयांवर मोफत कार्यशाळा उत्साहात.

आपण कमवत असलेल्या पैशाचे योग्य नियोजन करून आपल्या संपती कशा प्रकारे वाढ करता येईल. गुंतवणुकीवर सल्ला आर्थिक नियोजन व मार्गदर्शन शेअर मार्केटच्या परिस्थितीनुसार गुंतवणुकीवर संधी कशा प्रकारे उपलब्ध होते. या मोफत कार्यशाळेचे आयोजन ऋणानुबंधन इन्शुरन्स व इन्व्हेस्टमेंटचे सल्लागार संतोष तनपुरे यांनी केले. यावेळी संकेत दळवी, अर्चना पाळंदे, हर्षल तनपुरे, साक्षी तनपुरे, सिद्धांत नेहे, राहुल गोसावी यांनी प्रयत्न केले.

# कान्हेगाव ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी वाळूंज

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**कोळपेवाडी :** कोपरगाव तालुक्यातील कान्हेगाव ग्रामपंचायतीचे विद्यमान उपसरपंच दिपक चौधरी यांनी रोटेशननुसार आपल्या पदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या उपसरपंचपदी काळे गटाचे अमोल विठ्ठलराव वाळूंज यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

यावेळी सर्व सदस्य व काळे गटाच्या कार्यकर्त्यांनी नवनिर्वाचित उपसरपंच अमोल वाळूंज यांचा सत्कार केला. याप्रसंगी गणेश सोनवणे, दिपक चौधरी, संध्या सांगळे, चित्र भाकरे, मालन मगर, जयश्री पवार, नंदकुमार आव्हाड, प्रदीप हिवराठे, विशाल पांडव, बबन सांगळे, लक्ष्मण चौधरी, देवचंद कढेकर, दत्तात्रय वाळुंज, संतोष वाळुंज, संदीप वाळुंज, बबन वाळुंज, शरद सांगळे, दत्तात्रय मगर, प्रभाकर भाकरे, अशोक काजळे, संदिप काजळे, गणेश करडे, प्रसाद चौधरी, रमेश काळे, सागर शिंदे, योगेश जगताप, सचिन चौधरी, अक्षय भाकरे, संकेत भाकरे, शुभम चौधरी, माधव चौधरी, मनोज काजळे, किरण वाळूंज, बाबासाहेब काजळे, संदीप भाकरे, डॉ. लहिरे, डॉ. काळे, रमेश सोळसे, सुनील काजळे, अनिल काजळे मान्यवरांसह काळे गटाचे कार्यकर्ते व कान्हेगावचे ग्रामस्थ उपस्थित होते.

# पावसाने ओढ दिल्याने ऊसाचे क्षेत्र धोक्यात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**पुणतांबा :** मान्सूनच्या पावसाने ओढ दिल्यामुळे तसेच गोदावरी उजव्या कालव्यातून शेतीसाठी आर्वतन सोडण्याची शक्यता फारच कमी असल्यामुळे पुणतांबा परिसरातील शेकडो एकर क्षेत्रातील ऊसासह इतरही पिकांचे आस्तित्व धोक्यात आले आहे. येत्या आठ दिवसात मान्सूनने हजेरी लावली नाही तर ऊसाचे पिक वाळण्याची भिती व्यक्त केली जात आहे. पुणतांबा व रास्तापूर ह्या दोन्ही गावांचे शिवार ऊंदाजे ३९५० हेक्टर असून सध्या अंदाजे ६०० हेक्टर क्षेत्रात ऊस असल्याचा प्राथमिक अंदाज कृषी सहाय्यक अधिकारी पुणतांबा यांनी व्यक्त केला आहे गणेश कारखान्याकडे पुणतांबा गटात अंदाज ३५० हेक्टर नोंद असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे गणेश कारखाना सोडून इतर कारखान्यांना सुध्दा परिसरातील ऊस उत्पादक शेतकरी ऊस देत असतात. मागील वर्षी परिसरात सरासरीपेक्षा जास्त पर्जन्यमान झाले होते. त्यामुळे ऊसाचे क्षेत्र वाढले होते त्यामुळे खोडवा पिकाबरोबरच आडसाली ऊसाचे क्षेत्र वाढले आहे परिसरातील ऊसशेती प्रामुख्याने गोदावरी उजव्या कालव्याच्या पाट पाण्यावर अवतंबून आहे. सध्या शेतीव पिण्यासाठी साधारतः ४५ ते ५० दिवसाच्या अंतरांनी आर्वतन सोडले जाते.

# मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे सपत्नीक साई दर्शन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**शिर्डी :** झारखंड राज्याचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी आपल्या पत्नीसह शिर्डीत येऊन साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेतले. साई दर्शनानंतर साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर यांनी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचा शाल आणि साईबाबांची मूर्ती देऊन सत्कार केला.

धार्मिक आणि आध्यात्मिक स्थळांना भेट दिल्याने मनाला शांतता मिळते तसेच संकटांशी लढण्याचे साहस आणि जीवनात काहीतरी चांगले करण्याची प्रेरणा मिळते. अशी भावना झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी साईबाबांच्या दर्शनानंतर माध्यमांशी बोलताना व्यक्त केली. साईबाबांच्या आशीर्वादामुळेच आम्ही सर्वजण जनतेच्या सेवेसाठी कार्यरत आहोत. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त झारखंड राज्याचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी शुभेच्छा दिल्या. माणूस असल्यावर चुका होणे स्वाभाविक आहे. मात्र, आगामी काळात जनतेसाठी जास्तीत जास्त चांगली कामे करता यावीत आणि चुका कमीत कमी व्हाव्यात याच उद्देशाने साईबाबांच्या चरणी प्रार्थना करून आशीर्वाद घेतला असल्याचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी सांगितले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय-कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक: करण बाबासाहेब नवल RNI No. MAHM-R/2019/82605 www.rashtrasahyadri.com owner publisher Printer Kakasaheb Babasaheb Nawale To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur, Dist., Ahilyanagar, Maharashtra 413 709, India
Editor: Karan Babasaheb Nawale RNI No M-HM-R/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmailID- rashtrasahyadrigmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26)

## द•ख•ल

### निवृत्तीनाथांच्या पालखी सोहळ्याच्या नियोजनाचा आढावा

**श्रीरामपूर** : विश्वगुरु संत निवृत्तीनाथ महाराज पालखी सोहळाच्या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विजय मुळीक व गटविकासअधिकारी विवेक गुंड यांनी बेलापूर बु ग्रामपंचायतीस भेट देऊन आढावा घेतला.त्रिंबकेश्वर येथून निघणारा निवृतीनाथांचा पालखी सोहळा बेलापूर येथील भारतबुवा हिरवे यांनी सुरु केला. त्यामुळे या पालखीचा बेलापूर येथील विठ्ठल मंदिरात मुक्काम होतो.या पार्श्वभूमीवर नियोजनाचा आढावा घेण्यात आला.

### योगाच्या सामर्थ्याने उजळले प्राईड अकॅडमीचे प्रांगण



**टाकळीभान** : निरोगी शरीर, शांत मन आणि सकारात्मक जीवनशैलीचा संदेश देणारा आंतरराष्ट्रीय योग दिन प्राईड अक्॓डमी, भेर्डापूर येथे मोठ्या उत्साहात आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण परिसर योगमय झाला होता. यावेळी विद्यार्थ्यांना योगामुळे शारीरिक क्षमता वाढण्याबरोबरच मानसिक स्थैर्य, आत्मविश्वास आणि एकाग्रता विकसित होते, याची माहिती देण्यात आली. सूर्यनमस्कार हा संपूर्ण शरीराचा सर्वांगिण व्यायाम असून तो शरीराला ऊर्जा, स्फूर्ती आणि लवचिकता प्रदान करतो, असेही सांगण्यात आले. कार्यक्रमात प्राचार्या अस्मिता देवरे, प्री-प्रायमरी प्राचार्या प्रीती गोटे आणि उपप्राचार्य प्रदीप गोराणे यांनी विद्यार्थ्यांना दैनंदिन जीवनात योगाचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. विद्यार्थ्यांचा उत्साह, शिस्तबद्ध सहभाग आणि योगाविषयीची जागरूकता यामुळे हा उपक्रम विशेष ठरला.

### श्रीरामपुरात खा. वाकचौरे यांच्या प्रतिमेला जोडे मारुन निषेध

**श्रीरामपूर** : खा. भाऊसाहेब वाकचौरे यांनी उबाठा शिवसेना सोडून स्वतंत्र गटात सहभागी होत शिंदे गटाला पाठिंबा दिल्याच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तीव्र निषेध व्यक्त केला. तालुकाप्रमुख लखन भगत यांच्या नेतृत्वाखाली बेलापूर-राहूरी मार्गावर आंदोलन करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी खासदार वाकचौरे यांच्या प्रतिमेला जोडे मारत घोषणाबाजी केली. आंदोलनकर्त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की, शिवसैनिकांच्या मेहनतीच्या बळावर निवडून आलेल्या नेतृत्वाने पक्षाशी निष्ठा राखणे अपेक्षित असते. मात्र, पक्षांतराच्या निर्णयामुळे कार्यकर्त्यांमध्ये नाराजी निर्माण झाली असून हा निर्णय जनभावनांच्या विरोधातील असल्याचा आरोप त्यांनी केला.यावेळी कार्यकर्त्यांनी खा.वाकचौरे यांच्या भूमिकेवर टीका करत निषेध नोंदविला. तसेच आगामी काळात पक्ष संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धारही व्यक्त करण्यात आला.यावेळी शिवसेनेचे ( उद्धव बाळासाहेब ठाकरे ) गटाचे अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

### दूध देण्यासाठी जाणाऱ्या तरुणावर कुऱ्हाडीने हल्ला; तिघांविरुद्ध गुन्हा

**राहुरी** : तालुक्यातील कानडगाव येथे दूध देण्यासाठी जात असलेल्या एका तरुणाला रस्त्यात अडवून मारहाण करत कुऱ्हाडीने जखमी केल्याची घटना ११ जून रोजी घडली. याप्रकरणी तिघांविरुद्ध राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सचिन बाळासाहेब धोडे (वय २८, रा. कानडगाव) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ते मोटरसायकलवरून डेअरीला दूध देण्यासाठी जात असताना आरोपींनी त्यांना अडवून शिवीगाळ व दमदाटी केली. त्यानंतर लाथाबुक्क्यांनी मारहाण करून कुऱ्हाडीने वार केल्याने ते गंभीर जखमी झाले. तसेच पुन्हा आमच्या नादी लागल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. या गोंधळात त्यांच्या गळ्यातील सुमारे दोन तोळे वजनाची सोन्याची चैनही हिसकावून घेण्यात आल्याचा आरोप आहे. या प्रकरणी अभिजीत नानासाहेब धोडे, संदीप नानासाहेब धोडे व नानासाहेब लक्ष्मण धोडे (सर्व रा. कानडगाव) यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# शेतकऱ्यांनी बाजार भरवून केला कोल्हे गटाच्या निष्क्रीयतेचा निषेध

## मोर्विस उपबाजार समितीतीत शेतकऱ्यांचे अनोखे आंदोलन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी** : तालुक्यातील मोर्विस येथील उपबाजार समितीत आज शेतक-यांनी चक्क प्रतिकात्मक बाजार भरवीला. सत्ताधारी कोल्हे गटाच्या निष्क्रियतेकडे लक्ष वेधण्यासाठी हा बाजार भरविण्यात आला. येथे शेतमालाचे लिलाव आजवर का सुरू केले नाही असा प्रश्न शेतकरी विचारीत होते. आता आमदार आशुतोष काळे यांनी लक्ष घालून येथील बाजार सुरू करावा असे साकडे शेतक-यांनी घातले.



हा प्रतिकात्मक बाजार परिसरात चर्चेचा विषय ठरला. मोर्विस बरोबरच सांगवी भुसार, धामोरी, मायगाव देवी, मोर्विस, चास नळी, वडगाव, बक्तरपूर,मंजूर, हंडेवाडी, कारवाडी, वेळापूर आदी गावातील शेतकरी या आगळ्या वेगळ्या आंदोलनात सहभाग घेतला.

शेतक-यांनी या ठिकाणी सत्यनारायण पुजा केली. कांद्याचे लिलाव करून उत्पादकांना प्रतिकात्मक टोकण देखील दिले. सभापती साहेबराव रोहोम व कोल्हे यांचा निषेध केला. उप बाजारासाठी भाडे तत्वावर जागा घेऊन सव्वा वर्षे लोटले. तरीही मोर्विस येथील उपबाजार समितीत सत्ताधारी कोल्हे गटाने अद्यापही शेतमालाचे लिलाव सुरू केले नाहीत. जागेच्या भाड्याचे पैसे वाया गेले. शिवाय या परिसरातील शेतकऱ्यांना शेतमाल विकण्यास अडचण निर्माण झाली.

त्यांना सध्या विस किलोमिटर अंतरावरील कोपरगाव बाजार समितीत येऊन शेतमाला विकावा लागतो. या उपबाजार समितीची अवस्था असून अडचण नसून खोळंबा अशी झाली. वेळेत लिलाव सुरू झाले असते तर परिसरातील गावांना फायदा आणि रोजगार निर्मीती झाली असती.

त्यामुळे आजच्या आंदोलनात सहभागी झालेल्या शेतक-यांनी कोल्हे गटाचे सभापती साहेबराव रोहोम व त्यांना मार्गदर्शन करणा-यांचा निषेध केला. कोल्हे गटाने नेहमीच कोपरगाव मतदारसंघातील पश्चिम भागावर अन्याय केला. मंजूर बंधारा असो की पश्चिम भागाला जोडणारा धारणगाव-कुंभारी पूल असो त्यांनी कधीही या समस्या सोवडवील्या नाहीत. राज्य मार्ग ७ च्या कामाबाबत देखील असाच अनुभव आहे.

> सहमतीच्या नावावर बाजार समितीत कोल्हे गटाने सभापती पद मिळवीले. नेहमी प्रमाणे शब्द पाळला नाही. सध्या बाजार समितीत अनाठाई खर्च आणि भ्रष्टाचार सुरू आहे. शेतकरी हिताचे निर्णय होत नाहीत. त्यामुळे काळे गटाच्या संचालकांनी यापूर्वीच आपले राजीनामेही दिले. माजी आमदार अशोकराव काळे यांनी पश्चिम भागाला शहराशी जोडणारा धारणगाव-कुंभारी पूल उभारला. आमदार आशुतोष काळे यांनी मंजूर बांधाऱ्याचे काम सुरु केले. देर्डे फाटा ते मोर्विस रस्त्याचे कॉंक्रिटीकरण सुरु आहे. त्यामुळे आता आमदार आशुतोष काळे यांनीच वैयक्तिक लक्ष घालून मोर्विस उपबाजार समितीचा प्रश्न मार्गी लावावा. अशी मागणी या भागातील शेतक-यांनी केली आहे.

## कष्ट मेहनतीमुळे विद्यार्थ्यांचे खरे यश : ढोकणे




प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**उंबरे** : कष्ट, मेहनत, जिद्द हे विद्यार्थ्याचे खरे यश असल्याचे प्रतिपादन स्कूल कमिटीचे अध्यक्ष कर्मवीर भाऊराव ढोकणे यांनी सागितले. राहुरी तालुक्यातील ब्राम्हणी भाग शाळा उंबरे येथील डॉ.तनपुरे सहकारी साखर कारखान्याशी संलग्न असणाऱ्या शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे आदर्श विद्यालय या शाळेचा इयत्ता दहावीचा निकाल शंभर टक्के लागला आहे. यावेळी ग्रामस्थ व पालक यांच्या संयुक्त विद्यमाने शाळेच्या सर्व शिक्षकवृंदांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला.त्याप्रसंगी ढोकणे बोलत होते.

यावेळी ते म्हणाले की, पुढील वर्षी शाळेचा निकाल शंभर टक्के लागेलच, यात तिळमात्र शंकाच नाही, परंतु ७५ टक्के विद्यार्थी डिस्टिंक्शन म्हणजे ७० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झाले पाहिजे, अशी माझ्यासह पालकांची इच्छा आहेत.ते म्हणाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाबुराव पटारे हे होते, तर, डॉ. तनपुरे कारखान्याचे विद्यमान संचालक भास्करराव ढोकणे, संजय अडसुरे, मेजर पटारे, शरद वसंत ढोकणे, आदिनाथ महाराज दुशिंग ,प्रवीण ढोकणे ,रावसाहेब ढोकणे,लक्ष्मण काळे, कारभारी ढोकणे, विलास ढोकणे, राजश्री ढोकणे, अपर्णा ढोकणे ,कविता ढोकणे आदी मान्यवर उपस्थित होते.

भाऊराव ढोकणे पुढे बोलताना म्हणाले की,शाळेच्या इमारतीची जी दुरावस्था झालेली आहेत. त्याबाबत लवकरात लवकर दुरुस्ती करण्यासाठी अरुण तनपुरे हे हातभार लावणार असल्याचे ढोकणे यांनी सांगितले. याप्रसंगी शाळेचे उपप्राचार्य एस जाधव, उपशिक्षक पि के पवार,जे.एन. दुशिंग, आर कदम, गोसावी ,धामोरे, जाधव, मरभळ, आवटी, एम पी अडसुरे, एस तांबे एस बेलेकर, सौ. कदम, घुले, रोडे, सय्यद, रोडे आदि शिक्षक शिक्षकेतर कर्मचारीवृंद यांच्यासह पालक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्रीरामपूरच्या आठवडा बाजारात मोबाईल चोरीच्या घटनांत वाढ; नागरिकांमध्ये संताप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : शहरातील आठवडा बाजार परिसरात मोबाईल चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. चोरीच्या घटनांचा तातडीने तपास करून आरोपींना अटक करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन यांनी दिला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सुमारे दोन महिन्यांपूर्वी आठवडा बाजारातून एका पत्रकाराचा मोबाईल चोरीला गेला होता.



या प्रकरणाचा अद्याप उलगडा झालेला नाही. दरम्यान, शुक्रवारी (दि. १९ जून) बाजारात आणखी एक मोबाईल चोरीची घटना घडली. श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका पोलीस हवालदारांच्या पत्नीचा मोबाईलही बाजारातून चोरीला गेल्याचे समोर आले आहे. याच दिवशी सुभाष त्रिभुवन यांचा मोबाईल चोरण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका चोरट्याला त्यांनी रंगेहात पकडले. मात्र, गर्दीचा फायदा घेत संबंधिताने मोबाईल खाली टाकून घटनास्थळावरून पळ काढला. या संशयिताचा फोटो काढून पोलिसांकडे सुपूर्द करण्यात आल्याची माहिती त्रिभुवन यांनी दिली. स्थानिक नागरिकांच्या म्हणण्यानुसार, आठवडा बाजारात दर शुक्रवारी चार ते पाच मोबाईल चोरीला जाण्याच्या घटना घडतात.

मात्र, अद्याप कोणत्याही मोठ्या प्रकरणातील आरोपी पोलिसांच्या हाती लागलेले नाहीत. त्यामुळे बाजारात खरेदीसाठी येणाऱ्या नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना वाढत आहे. मोबाईल चोरीनंतर त्यातील ट्रॅकिंग प्रणाली निष्क्रिय करून तांत्रिक फेरफार केल्यानंतर त्यांची विक्री केली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे. या चोरीमागे संघटित रॅकेट कार्यरत असण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. याबाबत सुभाष त्रिभुवन, ज्येष्ठ पत्रकार मनोज आगे व मर्चंट असोसिएशनचे संचालक गौतम उपाध्ये यांच्या हस्ते पोलीस निरीक्षक विशाल खैरे यांना निवेदन देण्यात आले.

## राहुरीत पीएम किसान निधी हस्तांतरण सोहळ्याचे प्रक्षेपण

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : पश्चिम बंगाल येथील तारकेश्वर, हुगळी येथून देशातील नऊ कोटीं ४४ लाख शेतकऱ्यांना १८ हजार ८८० कोटी रुपयांचा पंतप्रधान किसान सन्माननिधी योजनेचा २३ वा हप्ता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वितरित केला. यानिमित्ताने झच-घखडछ उत्सव दिवस साजरा करण्यात आला. महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे व विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अधिष्ठाता डॉ. सातापा खरबडे यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचे ऑनलाईन प्रक्षेपण विद्यापीठात विद्यार्थी आणि शास्त्रज्ञांसाठी करण्यात आले. याप्रसंगी आंतरविद्याशाखा जल व्यवस्थापन विभाग प्रमुख डॉ. विजयकुमार पाटील, कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्रातील विषय विशेषज्ञ प्रा. अन्सारखान आत्तार, प्रगतशील शेतकरी प्रकाश सखाराम गायकवाड व इतर शास्त्रज्ञ, शेतकरी, कर्मचारी तसेच विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मानोरी येथे नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत शेतकऱ्यांची शेती शाळा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या वतीने मानोरी येथे कृषीभूषण डॉ. दत्तात्रय वने यांच्या शेतावर नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत शेतकऱ्यांसाठी शेती शाळा प्रशिक्षण वर्गाचे आयोजन करण्यात आले.

या उपक्रमाला परिसरातील शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प्रशिक्षणात सहाय्यक कृषी अधिकारी सारिका हरिश्चंद्रे यांनी शेती शाळेची संकल्पना स्पष्ट करत नैसर्गिक शेतीसाठी आवश्यक निविष्ठा शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतातच तयार करण्याचे महत्त्व सांगितले. तसेच दशपर्णी अर्कासाठी लागणाऱ्या विविध वनस्पतींपासून अर्क तयार करण्याचे प्रात्यक्षिकही घेण्यात आले.




उपकृषी अधिकारी बाळासाहेब सुळ व गौरव वने यांनी सोयाबीन उगवण क्षमता चाचणी व बियाणे प्रक्रियेबाबत मार्गदर्शन केले. वाल्मिकी ॲग्रोचे सोमनाथ तोडमल यांनी ईएम सोल्युशन, जैविक खते व नैसर्गिक शेतीतील औषधांविषयी माहिती दिली. सहाय्यक कृषी अधिकारी शिवप्रसाद कोहकडे यांनी 'कापूस कांती' योजनेची माहिती शेतकऱ्यांना दिली.

या प्रशिक्षण वर्गात सतिश कु-हे, बापुसाहेब वाघ, शिवाजी थोरात, गणेश परभणे, भरत आढाव, राहुल वाकचौरे, ताराबाई ठुबे, रोहिणी वने, माया आढाव, संगीता जाधव यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## सोनईतला युवक बेपत्ता; पोलिसांत नोंद

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : नेवासा तालुक्यातील सोनई जवळील धनगरवाडी येथील २२ वर्षीय युवक घरातून बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. याबाबत सोनई पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद करण्यात आली आहे. युवकाचा शोध घेण्यासाठी पोलीस यंत्रणा व नातेवाईकांकडून प्रयत्न सुरू आहेत. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, सोनई जवळील धनगरवाडी येथील रहिवासी व मोलमजुरी तसेच मंडपाचा व्यवसाय करणारे संजय पुंजाराम वैरागर यांनी सोनई पोलीस ठाण्यात दिलेल्या खबरीनुसार त्यांचा मोठा मुलगा किशोर संजय वैरागर (वय २२) हा दि. २ जून २०२६ रोजी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास घरातून बाहेर गेला. त्यानंतर तो परत न आल्याने कुटुंबीयांनी नातेवाईक व परिचितांकडे शोध घेतला. मात्र त्याचा कोणताही ठावठिकाणा लागला नसल्याने अखेर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. सोनई पोलिसांनी युवकाचा शोध सुरू केला असून नागरिकांना संबंधित युवकाबाबत कोणतीही माहिती मिळाल्यास तात्काळ सोनई पोलीस ठाण्याशी या नंबर वर ०२४२७ / २३१५३३ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



## सोनई जिल्हा परिषद मराठी शाळेची दुरवस्था; विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**सोनई** : संपूर्ण महाराष्ट्रात शिक्षण क्षेत्रात विविध उपक्रम राबविले जात असताना नेवासा तालुक्यातील सोनई येथील जिल्हा परिषद मराठी शाळा क्रमांक १ ची दुरवस्था समोर आली आहे.

मूलभूत सुविधांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असून त्यांच्या सुरक्षेचाही प्रश्न निर्माण झाला आहे. शाळेत मुलींसाठी पुरेशी शौचालय सुविधा नसल्याची तक्रार असून पाणीपुरवठा आणि परिसरातील स्वच्छतेचीही गंभीर समस्या आहे.

शाळेला संरक्षण भिंत व प्रवेशद्वार नसल्याने रात्रीच्या वेळी असामाजिक घटकांकडून परिसराचा वापर केला जात असल्याचे सांगण्यात येत आहे. परिसरात फुटलेल्या काचेच्या बाटल्या व कचरा आढळून येत असल्याने विद्यार्थ्यांनाच साफसफाई करावी लागत असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. शाळेतील विविध विकासकामे कागदोपत्री पूर्ण दाखविण्यात आली असली तरी प्रत्यक्षात अनेक सुविधा अपूर्ण असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याबाबत मुख्याध्यापकांनी अनेकदा संबंधित विभागाकडे पाठपुरावा केल्याचे सांगितले जाते.

> जिल्हा परिषद मराठी शाळेतील अनेक सुविधा केवळ कागदावरच झाल्याचा आरोप आहे. संबंधित कामांची चौकशी करून दोषींवर गुन्हे दाखल करण्यात यावेत.
> **संजय वैरागर, सामाजिक कार्यकर्ते**

तसेच शाळेच्या जागेवर वाढत असलेल्या अतिक्रमणाकडेही प्रशासन दुर्लक्ष करीत असल्याची चर्चा आहे.

मुलींसाठी आवश्यक सुविधा नसल्यामुळे काही पालकांनी आपल्या मुलांचे इतर शाळांमध्ये प्रवेश घेतल्याचे समोर आले आहे. या सर्व प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित जबाबदार अधिकारी व ठेकेदारांवर कारवाई करावी तसेच शाळेला आवश्यक सुविधा उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी ग्रामस्थ व पालकांकडून होत आहे.

# हरवलेला पैसा पुन्हा मिळविता येतो पण हरवलेली वेळ परत मिळत नाही : प्रा. प्रवीण दवणे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोपरगांव** : आयुष्यात पैसा आणि वेळ या दोन्हीही गोष्टी माणसांसाठी आवश्यक आहेत. या दोन्हींपैकी पैसा हरवला तर तो पुन्हा कमविता येतो परंतु वेळ हरवली तर ती पुन्हा परत येत नाही. म्हणून आयुष्यात जो वेळ पाळतो त्यालाच वेळ पाळते असे उद्गार ठाणे येथील ज्येष्ठ साहित्यिक, कवी व गीतकार प्रा. प्रवीण दवणे यांनी संवत्सर येथील व्याख्यानातून व्यक्त केले. गोदावरी खोरे नामदेवरावजी परजणे पाटील तालुका सहकारी दूध संघाचे संस्थापक दिवंगत नेते नामदेवराव परजणे पाटील (आण्णा) यांच्या २२ व्या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त संवत्सर येथे आयोजित केल्या गेलेल्या व्याख्यानातून ' नवीन पिढी घडविताना..' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

पुणे येथील ज्येष्ठ विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ अनिलराव गुंजाळ हे सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी होते. राज्याचे जलसंपदामंत्री ना. राधाकृष्ण विखे, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा शालिनीताई विखे, आ. रमेश बोरनारे, महानंदचे माजी उपाध्यक्ष राजेंद्रबापू जाधव, पाटबंधारे विभागाचे माजी उप अभियंता भास्करराव सुरळे, माजी नगराध्यक्ष विजयराव वहाडणे, राहुरी तालुका सहकारी दूध संघाचे अध्यक्ष ड. तान्हाजी धसाळ, प्रा. नारायण बारसे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी स्व. परजणे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. गोदावरी खोरे दूध संघाचे अध्यक्ष राजेश परजणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. आजचे युग विज्ञान, तंत्रज्ञान आणि माहितीच्या झपाट्याने वाढणाऱ्या प्रवाहाचे युग आहे. नवीन पिढी आधुनिक साधनांचा वापर करून जगाशी जोडली जात असली तरी ज्ञान आणि कौशल्ये मिळविण्यासोबतच जीवनमूल्यांचे शिक्षण मिळणेही तितकेच आवश्यक असल्याचे सांगून प्रा. दवणे पुढे म्हणाले, नवीन पिढी घडविणे ही केवळ पालक किंवा शिक्षकांची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.




सुसंस्कारित, सुशिक्षित आणि संवेदनशील पिढी घडविण्यातूनच सक्षम, समृद्ध आणि प्रगत राष्ट्राची निर्मिती होऊ शकते. नवीन पिढी हीच उद्याच्या भारताची खरी शक्ती आहे. आजच्या धावपळीच्या जीवनात मोबाईल आणि सोशल मीडियाच्या प्रभावाखाली अनेकदा नवीन पिढीमध्ये एकलकोंडेपणा, असंहिष्णुता आणि स्वकेंद्रित वृत्ती वाढताना दिसते. मोबाईल शंभर टक्के वाईट आहे असे म्हणणे चुकीचे ठरेल. त्याद्वारे काही चांगल्या गोष्टींचे ज्ञानही आपल्याला मिळविता येते.

परंतु चांगले घेण्याची बहुतांशी तरुणांना सवयच राहिलेली नाही. त्यामुळे तरुण पिढी वैफल्यग्रस्ततेकडे चालल्याचे विदारक सत्य समोर दिसते आहे. अशा परिस्थितीत कुटुंब, शाळा आणि समाजाने पुढे येऊन तरुण पिढीला योग्य दिशा देणे गरजेचे आहे. मार्गदर्शन आणि संस्कारांमुळे मुलांमध्ये देशप्रेम, सामाजिक बांधिलकी, पर्यावरण संवर्धनाची जाणीव आणि मानवतेचा दृष्टिकोन विकसित होतो. चांगले संस्कार असलेली पिढी केवळ स्वतःच्या प्रगतीसाठी नव्हे तर समाज आणि राष्ट्राच्या उन्नतीसाठीही योगदान देते असेही प्रा. प्रवीण दवणे यांनी सांगितले.

ना. राधाकृष्ण विखे यांनी स्व. नामदेवराव परजणे यांच्या आठवणींना व कार्याला उजाळा देताना दूध उत्पादकांना न्याय मिळवून देण्यासाठी पस्तीस - चाळीस वर्षापूर्वी राज्यात उभारलेल्या प्रचंड आंदोलनाचे नेतृत्व परजणे आण्णा यांनी केले होते. त्यावेळी दुधाला योग्य दर आणि दुग्ध व्यवसायासाठीच्या सोई - सुविधा शासनाकडून मिळवून घेण्यात त्यांनी पुढाकार घेतला होता. आण्णांनी दुग्ध व्यवसायाच्याही पलिकडे जाऊन सर्वसामान्य लोकांसाठी केलेले काम आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगून आण्णांनी केलेल्या संघर्षाची जाणीव ठेऊन वाटचाल करणे हीच त्यांना पुण्यस्माणानिमित्त खरी आदरांजली ठरेल असेही ना. विखे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले. शिक्षणतज्ज्ञ अनिल गुंजाळ यांनीही आपल्या भाषणातून आजचा काळ वेगवान तंत्रज्ञान, बदलती जीवनशैली आणि वाढती स्पर्धा यांचा आहे. अशा परिस्थितीत नवीन पिढी घडविण्याचे कार्य अत्यंत जबाबदारीचे आणि महत्त्वाचे ठरते.

राष्ट्राचे भविष्य हे नव्या पिढीच्या हातात असते. त्यामुळे त्यांच्यावर योग्य संस्कार, मूल्ये आणि ज्ञानाची पेरणी करणे आवश्यक असल्याचे सांगून संवत्सर येथे अखंडपणे सुरु असलेली व्याख्यानमाला महाराष्ट्रातल्या व्याख्यानमालेतील सर्वात सुंदर व्याख्यानमाला असल्याचे सांगितले. ना. विखे यांच्या वाढदिवसानिमित्ताने तालुक्याच्या पूर्व भागातील कार्यकर्त्यांनी सुमारे अकराशे वह्या ना. विखे पाटील यांच्याकडे सुपूर्द केल्या. पुण्यस्मरण सोहळ्यापूर्वी ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी जिल्हा परिषद शाळेस भेट देऊन शाळेत नव्याने उभारण्यात आलेल्या बालस्नेही बहुद्देशीय सभागृह व हॅन्डवॉश स्टेशन या उपक्रमांचे उद्घाटन केले.

तसेच शाळेत राबविल्या गेलेल्या विविध शैक्षणिक उपक्रमांची पाहणी करुन कौतूक केले. राजेश परजणे पाटील यांनी व्यक्त केलेल्या आभार प्रदर्शनानंतर तीन दिवस सुरु असलेल्या व्याख्यानमालेचा समारोप झाला. सोहळ्यासाठी विविध स्तरातील मान्यवर, शासकीय अधिकारी, शिक्षक पालक, विद्यार्थी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १ वरून | पान १ वरून

## सहकारी साखर उद्योगाला आधार देण्यासाठी ३ हजार कोटींचे प्रकल्प : अमित शहा

साखर उद्योगासाठी दोन महत्वपूर्ण प्रकल्प राबविण्यात येणार असल्याची घोषणा केली. तपशील देताना शहा यांनी सांगितले की, जे साखर कारखाने इथेनॉल, कॉम्प्रेस्ड बायोगॅस (सीबीजी), सायट्रीक ॲसिड आदी उप उत्पादने बनवू शकत नाहीत, अशांनी एकत्रित येऊन अशाप्रकारची उत्पादने घेण्यासाठी १५०० कोटी रुपये खर्चाचा सहकार तत्वावरील प्रकल्प कोल्हापूर जिल्ह्यात राबविला जाणार आहे. तर पुणे येथील नॅशनल हेवी इंजिनिअरींग येथे वरील उत्पादने तयार करण्यासाठी लागणार्या यंत्रसामग्रीचे उत्पादन केले जाईल. यासाठीही १५०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाणार आहे. या ३ हजार कोटी रुपये गुंतवणूकीच्या या दोन्ही प्रकल्पात मिळणारा नफा साखर कारखाने विभागून घेऊ शकतात. या माध्यमातून राज्यातील सहकारी साखर उद्योगाला मोठी ताकद मिळेल, हे दोन्ही प्रकल्प येत्या तीन महिन्यात सुरु होतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

**घोषणाबाजी करणाऱ्या मराठी बांधवांना पोलिसांनी हटवले**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या कोल्हापूर दौऱ्यादरम्यान महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्न पुन्हा एकदा चर्चेत आला. श्री अंबाबाई मंदिर विकास आराखड्यासाठी केंद्र सरकारने मंजूर केलेल्या निधीबद्दल आयोजित करण्यात आलेल्या महायुतीच्या 'धन्यवाद सभे'त सीमाभागातील मराठी भाषिकांनी बेळगाव, निपाणी, बिदर आणि भालकीसह संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी घोषणाबाजी केली. मात्र पोलिसांनी हस्तक्षेप करत आंदोलकांना सभास्थळाबाहेर काढल्याने काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. सभास्थळी उपस्थित काही मराठी भाषिकांनी सीम ाप्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी घोषणाबाजी सुरू केली. पोलिसांनी तत्काळ हस्तक्षेप करून संबंधितांना सभास्थळाबाहेर नेले. बाहेरही काही काळ घोषणाबाजी आणि पोलिसांशी किरकोळ धक्काबुक्की झाल्याचे सांगण्यात आले.

## पवनराजे खटल्यातील पद्मसिंह पाटलांचा सर्व आरोपी निर्दोष

अधिकृत अटक २५ सप्टेंबर दाखवली. या दरम्यान त्याला १५ दिवस बेकायदेशीर ताब्यात ठेवून मारहाण करण्यात आली, औषधे बंद केली आणि कबुलीजबाब घेतला. हा पहिला जबाब कायद्याला धरून नव्हता आणि सरकारी पक्षाने ही माहिती न्यायालयाला न सांगून मोठी घोडचूक केली, ज्यामुळे हा पुरावा संशयाच्या खाईत ढकलला गेला. दोन्ही जबाबात मोठी तफावत आहे. माफीच्या साक्षीदाराने पैशांमुळे हा गुन्हा केल्याचा दावा केला होता, जो न्यायालयाने फेटाळून लावला. न्यायमूर्ती म्हणाले, साक्षीदाराचे मुंबई, नवी मुंबई, मिरा-भाईंदर येथे अनेक घरे आणि मिठाईची दुकाने आहेत. त्याच्याकडे साडेचार किलो सोन्याचे भांडवल आहे. त्याचा कुठलाही उद्योग डबघाईला आलेला नव्हता. अशा परिस्थितीत त्याला केवळ ५० हजार रुपयांची गरज होती म्हणून त्याने एवढी मोठी हत्या केली, हे अजिबात पटणारे नाही. त्याला सोयीनुसार खोटं बोलण्याची सवय आहे. तपासातील सर्वात मोठ्या त्रुटीवर बोट ठेवताना न्यायालय म्हणाले, या खटल्याचा तपास करताना कुठल्याही आरोपीचा मोबाईल फोन जप्त केलेला नाही. त्यांचे कॉल डिटेल्स रेकॉर्ड काढले गेले नाहीत. जप्ती पंचनाम्यात आरोपींच्या खिशात काय सापडले याची नोंद नाही. जर सीडीआर काढले असते, तर आरोपी एकमेकांच्या संपर्कात होते का, हे स्पष्ट झाले असते. घटनाक्रमात १२ कॉल रेकॉर्डचा उल्लेख आहे, ज्यातील एक फोन पीसीओ वरून झाला होता. पवनराजेंना आरोपींचा थेट फोन आलाच नाही, तर मग पाठलागाची आणि संवादाची ही कथा ग्राह्य कशी धरायची? न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, माफीच्या साक्षीदाराने हत्येच्या दिवशी तो मुंबईबाहेर कसा गेला, याच्या वेळोवेळी चार वेगवेगळ्या गोष्टी सांगितल्या. बोरिवलीहून गाडी पकडून थेट श्रीनाथजी मार्गे पडेसरीला गावी गेलो. आधी अहमदाबादला गेलो, मग श्रीनाथजीवरून गावी गेलो. बोरिवलीहून अहमदाबादला मित्राकडे मांडववाड्याला गेलो. बोरिवलीहून नाथद्वारा, तिथून कोठारावर शाळेत राहिलो, मग मांडववाड्यात मित्राकडे आणि तिथून अहमदाबादच्या 'भाग्यदोय' हॉटेलमध्ये राहिलो, अशा चार गोष्टी त्याने सांगितल्या. न्यायाधीश म्हणाले, प्रत्येक वेळी नवीन स्टोरी सांगणाऱ्या या साक्षीदाराची साक्ष अजिबात विश्वासार्ह म ानली जाऊ शकत नाही.

**गाडीच्या रंगाचा आणि घटनास्थळाचा घोळ**

गुन्ह्यात वापरलेली गाडी जळून खाक झाली होती. तरीही जप्ती पंचनाम्यात तिचा रंग 'हिरवा' कसा लिहिला? कागदपत्रे पाहून रंग लिहिल्याचे अधिकारी सांगतात, मात्र मूळ पुरावा सिद्ध होत नाही. एका साक्षीदाराने गाडी छोट्या घराच्या बाजूला उभी असल्याचे सांगितले, दुसऱ्याने बंगल्याच्या बाजूला, तर पोलीस रेकॉर्डनुसार ती मोकळ्या जागेत सापडली. या सर्व लहान गोष्टींम धील तफावत सरकारी पक्षाचा हेतू संशयास्पद बनवते.

**राजकीय दरी मान्य, पण...**

न्यायालयाने मान्य केले की, २००२ नंतर पवनराजे निंबाळकर आणि डॉ. पद्मसिंह पाटील यांच्यात तेरणा साखर कारखाना आणि निवडणुकीतील पराभवामुळे मोठी राजकीय दरी निर्माण झाली होती. पूर्ववैमनस्यातून हत्येचा कट रचल्याचा सीबीआयचा आरोप होता आणि पवनराजेंनी जीवाला धोका असल्याचे पत्रही जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. मात्र, केवळ राजकीय वैमनस्य आहे म्हणून कोणाला फासावर लटकवता येत नाही, त्यासाठी कायद्याला ठोस पुराव्यांची गरज असते

## आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या पुढाकाराने...

# नेवासा तालुक्यात पाट पाण्याचे यशस्वी नियोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : पावसाळा लांबणीवर गेल्याने नेवासा तालुक्यात पाण्याची मागणी मोठ्या प्रमाणात वाढली असताना आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे आणि राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सहकार्यामुळे मुळा धरणाच्या पाण्याचे रोटेशन नियोजनबद्ध पद्धतीने राबविण्यात आले. कडक उन्हाळ्याच्या परिस्थितीतही तालुक्यातील सर्व भागातील शेतकऱ्यांना वेळेत आणि पुरेसे सिंचनाचे पाणी उपलब्ध झाल्याने हजारो एकरांवरील खरीप, ऊस व इतर पिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मुळा उजवा कालव्याच्या सिंचनाखाली नेवासा तालुक्यातील सुमारे ६० ते ७० टक्के क्षेत्र येते. या क्षेत्रामधील अंतिम टोकावरील वाकडी, शिरजगाव, सुकळी, वडूले, सलाबतपूर, गोपाळपूर, खडका, जळके, तामसवाडी, सोनई, करजगाव, खरवंडी, उस्थळ दुमला, तरवडी, कुकाणा आणि चीलेखनवाडी या गावांनाही यंदा चांगल्या प्रकारे सिंचनाचे पाणी मिळाले. शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांपर्यंत पाणी पोहोचल्याने शेतकरी वर्गातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.



यंदा पाण्याची उपलब्धता मर्यादित असतानाही आमदार विठ्ठलराव लंघे यांनी शेतकऱ्यांची बाजू भक्कमपणे मांडत जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे रोटेशनचा कालावधी वाढविण्याची मागणी केली. आणि रोटेशन ४५ दिवसाचे करून त्यांच्या पाठपुराव्यामुळे आवर्तन अधिक काळ सुरू ठेवण्यात आले. त्यामुळे दूरवरच्या भागांपर्यंत पाणी पोहोचले, बंधारे, ओढे-नाले भरले आणि शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची वेळ टळली.

पाण्याचे रोटेशन सुरू असताना केवळ आदेश देऊन न थांबता आमदार लंघे यांनी संबंधित अधिकाऱ्यांशी सातत्याने संपर्क ठेवून परिस्थितीवर स्वतः लक्ष ठेवले. पाणी शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचावे, कोणत्याही गावावर अन्याय होऊ नये आणि शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यालाही न्याय मिळावा, यासाठी त्यांनी प्रभावी समन्वय साधला. यशस्वी पाठपाणी नियोजनामुळे नेवासा तालुक्यातील कृषी क्षेत्रात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून शेतकरी वर्गातून आमदार विठ्ठलराव लंघे आणि जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पाणी पोहोचविणे आणि त्यांच्या पिकांचे नुकसान टाळणे हेच आमचे उद्दिष्ट होते. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या सहकार्यामुळे आणि सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे नेवासा तालुक्यातील शेतकऱ्यांना वेळेत पाणी उपलब्ध करून देता आले. अशी प्रतिक्रिया आमदार विठ्ठलराव लंघे यांनी दिली

## समृद्धी महामार्गावर टँकरला धडक; हजारो लिटरची ऑइल गळती

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर** : मुंबई-नागपूर समृद्धी महामार्गावर भरधाव ट्रकने टँकरला पाठीमागून जोरदार धडक दिल्याने टँकरचे मोठे नुकसान होऊन त्यातील हजारो लिटर ऑईलची गळती झाल्याची घटना १९ जून रोजी रात्रीच्या सुमारास घडली. याप्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रामबहादूर चौरसिया ( रा. राजीव गांधीनगर, साल्टपॅन रोड, मुंबई) हा सिंहवाहिनी ट्रान्सपोर्टमध्ये चालक म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, १८ जून रोजी रायगड येथील डेपोमधून महिंद्रा ब्लॅझो टँकर (एमएच ०४ ,एमएच ६९९९) मध्ये ३५ हजार ९३० किलो पाईल गॅस ऑईल भरून झारखंडमधील कोडरमा येथील कंपनीकडे घेऊन निघाला होता.

दरम्यान शुक्रवारी मध्यरात्री दीड वाजेच्या सुमारास समृद्धी महामार्गावरील चॅनल क्रमांक ४७१.१ लगत नागपूरच्या दिशेने जात असताना पाठीमागून भरधाव ट्रकने (एमएच ०९ एफएल ८९९५) टँकरला जोरदार धडक दिली. या धडकेत टँकरच्या मागील भागासह इंजिनचे मोठे नुकसान झाले. तसेच टँकरच्या कोपऱ्याला भगदाड पडल्याने त्यातील ऑईलची मोठ्या प्रमाणावर गळती झाली. या अपघातात चालक विवेक चौरसिया याला दुखापत झाली नसली तरी टँकरचे मोठे नुकसान झाले. धडक दिल्यानंतर ट्रक चालकाने वाहनासह घटनास्थळावरून पळ काढला. या प्रकरणी वैजापूर पोलिस ठाण्यात ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ३०० अनाथ मुलांना धोंड्याचे जेवण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : मुळा सहकारी साखर कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक सारंगधर भिकाजी ठोंबरे यांनी नुकतीच सहकुटुंब चारधाम यात्रा पूर्ण केल्यानंतर धार्मिक विधींना समाजसेवेची जोड देत एक आदर्श उपक्रम राबविला. यात्रेनिमित्त आयोजित पारंपरिक जलपूजन (मावंदे) कार्यक्रम शिर्डी येथील साई आश्रय परिवार, पिंपळवाडी रोड, साई निवारा (रुई) या अनाथ आश्रमात संपन्न झाला. यावेळी अनावश्यक रूढी-परंपरांना फाटा देत ठोंबरे यांनी अत्यंत साधेपणाने व पारंपरिक पद्धतीने पूजन केले. त्यानंतर आश्रमातील सुमारे ३०० अनाथ मुलांना पूरणपोळी, आंबा रस व धोंड्याचे स्वादिष्ट जेवण देण्यात आला. कार्यक्रमानिमित्त पुणतांबे येथील मुक्ताई ज्ञानपीठाचे ह.भ.प. स्वरूपानंदगिरी महाराज यांच्या प्रवचनाचे आयोजन करण्यात आले होते. आपल्या प्रवचनात महाराजांनी ठोंबरे यांच्या या समाजोपयोगी उपक्रमाचे तोंडभरून कौतुक केले. धार्मिक कार्यक्रमास समाजसेवेची जोड देऊन अनाथ मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलविण्याचा हा उपक्रम अनुकरणीय असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच त्यांचे पराग व प्रीतिश या दोन मुलांच्या हातून अशीच सामाजिक सेवा देणेचे कार्य होऊ सर्व कुटुंब उच्च शिक्षित आणि संस्कारी म्हणून संपूर्ण परिसरात प्रचिती आहे. या कार्यक्रमास परिसरातील अनेक मान्यवर व भाविक, नातेवाईक उपस्थित होते.



**नेवासा** : येथील ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी व डॉ.बागवान हॉस्पिटलचे प्रमुख डॉ.मोहसीन बागवान यांनी पवित्र हज यात्रा पूर्ण केल्याबद्दल त्यांचा सन्मान करतांना नेवासा प्रेस क्लबचे कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण समवेत सौ. संगीता चव्हाण दिसत आहे.

## पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचा नेवासा प्रेस क्लबच्या वतीने सन्मान



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : येथील पोलीस स्टेशनला नव्याने रुजू झालेले पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांचा नेवासा प्रेस क्लबच्या वतीने स्वागत करत सन्मान करण्यात आला.

यावेळी नेवासा प्रेस क्लबचे अध्यक्ष गुरुप्रसाद देशपांडे,कार्याध्यक्ष सुधीर चव्हाण,उपाध्यक्ष कैलास शिंदे,अशोक डहाळे,रमेश शिंदे,नाना पवार,मकरंद देशपांडे, सुहास पठाडे,मोहन गायकवाड,शंकर नाबदे,पवन गरूड आदी उपस्थित होते.

उपस्थित पत्रकारांशी संवाद साधत पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांनी विविध विषयावर चर्चा केली, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य पत्रकारांनी करावे, त्यासाठी आपण खमकी भूमिका घेऊ, अशी ग्वाही यावेळी बोलताना पो.नि.दराडे यांनी दिली


**Change of Name**

Old name - **Ghansham Balasaheb Salunke.**
New name - **Ghanshyam Balasaheb Salunke** .
Adhar card no - 793250004211

**नावात बदल**

माझे लग्न पूर्वीचे नाव , **अमीना निसार शेख** (माझे शाळा सोडलेल्याचे दाखल्यावरील नाव) असे असून लग्नानंतर ते बदलून **अमीना बेगम खुर्शीद खान**(माझे आधार कार्ड वरील नाव) असे झाले आहे दोन्ही नावाच्या व्यक्ती मी एकच असून इतर अन्य दुसरी कोणी नाही.
प्रतिज्ञापत्र क्र २५५२२४२०३१२६८१००६००७३१
दिनांक ०५/०३/२०२६.

**Change of Name**

Old name: **SHAIKH WASIM SHAIKH CHAND SHAIKH** IS ON MY OLD PASSPORT. and My New Name is **VASIM CHAND SHEKH** as on Aadhar Card Number is **3373 7429 0095**
(20/06/2026)


## निधन वार्ता

### किसन गायकवाड



**सोमेश्वरनगर** - बारामती तालुक्यातील करंजेपुल गायकवाडवस्ती येथील ज्येष्ठ किसन बाळकू गायकवाड यांचे यांचे अल्पशा आजाराने दुःख निधन झाले, ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, भाऊ, मुलगा ,मुलगी नातवंडे असा परिवार आहे.

### सूर्यकांत जगताप



**सासवड** : पुरंदर तालुक्यातील ज्येष्ठ सहकार क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व तथा नीरा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सेवानिवृत्त सचिव सूर्यकांत बाबुराव उर्फ भुजंग जगताप (वय ८२) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. सहकार, कृषी व सामाजिक क्षेत्रातील एक अनुभवी मार्गदर्शक हरपल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन विवाहित मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. ग्रंथपाल माधवी माणिकराव शिळीमकर व माध्यमिक शिक्षिका वैजयंती राजेंद्र पायगुडे यांच्या ते वडील होत.

### सीताभाभी ठक्कर



**श्रीरामपूर** :येथील श्रीमती सीताभाभी वृजलाल ठक्कर (वय ८७) यांचे वृद्धपकाळाने शुक्रवार दि. १९ रोजी निधन झाले. त्यांच्या पश्चात दिर, एक मुलगा, चार मुली, सून, पुतणे, जावई व नातवंडे असा परिवार आहे. त्या हरिकमल प्लाझा मधील क्विक कुरिअर सर्व्हिसेसचे मालक राजेश ठक्कर यांच्या मातोश्री तसेच कांजी वेलजी ठक्कर यांच्या त्या भावजयी होत.

### मंदाबाई वाघ



**शिर्डी** : राहाता तालुक्यातील चितळी येथील मंदाबाई दिगंबर वाघ यांचे अल्पशा आजाराने नुकतेच निधन झाले. त्यांचे पश्चात पती व एक मुलगा व मुलगी असून येथील शेतकरी दिगंबर सोन्याबापू वाघ यांच्या पत्नी तर कोपरगाव तालुक्यातील सडे येथील सोसायटीचे उपाध्यक्ष शिवाजी बारहाते यांच्या चुलती होत.

### बाबासाहेब थोरात

**टाकळीभान** : येथील प्रगतशील शेतकरी व टाकळीभान सोसायटीचे माजी व्हा. चेअरमन बाबासाहेब नानासाहेब थोरात वय ( ६८ वर्ष) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. बोरावके महाविद्यालयाचे प्रा. बापूसाहेब थोरात यांचे ते वडील तर बापूसाहेब माने यांचे ते मामा होत.



## हनुमान विद्यालयाच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व गणवेश वाटप



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भेंडा** : नेवासा तालुक्यातील गोंडेगाव येथील नागेबाबा उद्योग समूह संचलित ,कृष्णाई शिक्षण संस्थेच्या हनुमान माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेशाचे वाटप करण्यात आले.

शनिवार दिनांक २० जून रोजी गोंडेगाव येथे हनुमान विद्यालयात झालेल्या कार्यक्रमात जलमित्र व पत्रकार सुखदेव फुलारी यांचे हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य व गणवेशाचे वाटप करण्यात आले. शाळा व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष आण्णासाहेब वाघुले, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष रोहिदास वाघुले, सर्व शिक्षक वृंद, ग्रामस्थ शिक्षक व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. फुलारी म्हणाले की,विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात विशिष्ट ध्येय ठेवून अभ्यास करावा.गुणवंत विद्यार्थ्यांना समाज मदत करण्यास नेहमी पुढे असतो.त्यामुळे त्याचा फायदा घेवून विद्यार्थ्यांनी अभ्यासावर आपले लक्ष केंद्रीत करावे आणि आपले व शाळेचे नाव उज्वल करावे.

एकल माता पिता असणाऱ्या विद्यार्थ्यांना यावेळी माजी प्राचार्य भागवत सर,बापू रोडगे,बाबासाहेब रोडगे महाराज व सागर रोडगे यांच्या मार्फत पूर्ण शैक्षणिक किटचे वाटप करण्यात आले . विद्यालयातील शिक्षकांच्या वतीने नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांना गणवेशाचे वाटप करण्यात आले.

मुख्याध्यापक संदीप फुलारी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.शिक्षक सागर बनसोडे यांनी समारोप केला.


## नशिबाची परिक्षा

रविवार, दि. २१ जून २०२६

**मिलनम डे**
उदय-अस्त | सिंगल ५-१-९ मजबुत
१४० २३० ३०० | ५-८ | १२५ १७० ११६
जोड ७५-५१-४८-८०-९२

**कल्याण**
उदय-अस्त | सिंगल ९-४-५ मजबुत
३३० ४८० २२८ | २-४ | १४८ २८० ५३०
जोड ६२-२३-१४-४०-४९

**मुंबैम (मेन)**
उदय-अस्त | सिंगल ४-७-९ मजबुत
१४६ ३२५ ८८० | १-२ | १३८ १२९ ११७
जोड ७१-१३-६२-२४-३४

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये.
मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |

* वरील शुभांक किंवा संख्या या ज्योतिषशास्त्र व संख्याशास्त्रावर आधारित आहेत. या शुभांकांचा कोणताही दुरुपयोग करू नये *

द•ख•ल

## झेंडीगेटमध्ये गॅस रिफिलिंग सेंटरवर छापा

**अहिल्यानगर :** शहरातील झेंडीगेट भागातील बाबा बंगाली गल्लीत उघड्या जागेवर शेडच्या आडोशाला बेकायदेशीरपणे घरगुती गॅस टाक्यांमधून वाहनांमध्ये गॅस भरणाऱ्या आरोपीला कोतवाली पोलिसांनी रंगेहात पकडले. या धडक कारवाईत पोलिसांनी १ लाख २७ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून आरोपीला ताब्यात घेतले आहे. पो.नि.नितीन देशमुख यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली. बाबा बंगाली गल्लीत विनापरवाना गॅसची चोरी आणि विक्री सुरू आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने दोन पंचांना सोबत घेऊन दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास बातमीतील ठिकाणी अचानक छापा टाकला. या छाप्यात आरोपी असीम हमीद शेख हा एका पांढऱ्या रंगाच्या मारुती ८०० गाडीमध्ये घरगुती गॅस सिलेंडरमधून बेकायदेशीरपणे गॅस भरताना मिळून आला. घटनास्थळावरून पोलिसांनी १ लाख रुपये किमतीची मारुती गाडी, गॅस भरण्याची विद्युत मोटार, कॉम्प्रेसर, रबरी पाईप, गॅस जोडणीचे साहित्य, वजनाचा काटा आणि भारत व एच.पी. कंपनीच्या एकूण आठ गॅस टाक्या जप्त केल्या. या प्रकरणाचा पुढील तपास कोतवाली पोलीस करत आहेत.

## सैनिक संघटनेची पोलीस निरीक्षकांशी कायदा सुव्यवस्थेबाबत चर्चा



**करंजी :** त्रिदल सैनिक सेवा संघ, पाथर्डीच्या पदाधिकाऱ्यांनी नवनियुक्त पो.नि. आनंद कोकरे यांची सदिच्छा भेट घेऊन तालुक्यातील कायदा व सुव्यवस्थेबाबत विविध विषयांवर चर्चा केली. सैनिकांसह सर्वसामान्य, गोरगरीब, कष्टकरी व शेतकरी नागरिकांवर अन्याय होऊ नये आणि प्रत्येकाला समान न्याय मिळावा, यासाठी पोलीस प्रशासनाने प्रभावी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली. पोलीस ठाण्यातील काही कर्मचाऱ्यांच्या गैरवर्तनामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले. यावर पो.नि. आनंद कोकरे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत ज्या भागांत चोरी व दरोड्यांचे प्रमाण अधिक आहे, त्या ठिकाणी माजी सैनिकांनी पोलिसांना सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. यास संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सकारात्मक प्रतिसाद देत गरज भासल्यास सैनिक नेहमीच जनतेच्या व पोलिसांच्या मदतीसाठी तत्पर राहतील, असे आश्वासन दिले. तालुक्यातील विविध घडामोडींवरही चर्चा झाली. पोलीस ठाण्याच्या कार्यपद्धतीत सकारात्मक बदल दिसून येतील, असे आश्वासन पोलीस निरीक्षक कोकरे यांनी दिले. यावेळी रोहिदास एडके, सुधाकर आव्हाड यांच्यासह संघटनेचे अनेक पदाधिकारी उपस्थित होते.

## नागवडे विधी महाविद्यालय एलएलबी प्रथम वर्षाचा निकाल शंभर टक्के

**लिंपणगाव :** श्रीगोंदा येथील तुळजाभवानी देव प्रतिष्ठान संचलित श्री शिवाजीराव नागवडे विधी महाविद्यालयाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या एल.एल.बी. प्रथम वर्षाच्या परीक्षेत शंभर टक्के निकालाची उल्लेखनीय परंपरा कायम राखली आहे. या परीक्षेत कु. मंजिरी मुरकुटे, यांनी प्रथम क्रमांक पटकावत महाविद्यालयाचे नाव उज्ज्वल केले. कु. साक्षी मचाले व रूपेश पोखरणा यांनी संयुक्तरीत्या द्वितीय क्रमांक मिळविला, जावेद शेख यांनी तृतीय क्रमांक संपादन केला आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे राजेंद्र नागवडे, अनुराधा नागवडे, सूर्यभान गोलांडे तसेच महाविद्यालयाच्य प्रा. डॉ. अंजुला चौबे यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाच्या शंभर टक्के निकालामुळे विद्यार्थी, पालक व परिसरातील नागरिकांकडून महाविद्यालयाचे कौतुक होत असून संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.



## विद्यार्थ्यांनी सर्वांगीण विकासावर भर द्यावा : धाडगे



**अहिल्यानगर :** आजच्या कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात केवळ शैक्षणिक प्रगती पुरेशी नसून विद्यार्थ्यांचे शरीर, मन, मनगट आणि मस्तक तंदुरुस्त असणे तितकेच आवश्यक आहे. अभ्यासासोबतच खेळ, कला, विज्ञान, तंत्रज्ञान आणि व्यक्तिमत्त्व विकास यांचा समतोल साधणारा विद्यार्थीच भविष्यात यशस्वी ठरू शकतो, असे प्रतिपादन पुणे येथील सहाय्यक अभियंता राजेंद्र धाडगे यांनी केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळा समितीचे चेअरमन स्वप्निल कुलकर्णी होते. सुरेश क्षीरसागर, दीपक ओहळ, संध्या कुलकर्णी, अजय महाजन, सुनील कानडे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक व विद्यार्थी उपस्थित होते.

# आषाढी वारीतील वारकऱ्यांना मिळणार आरोग्य सुविधा

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महाराष्ट्राच्या वैभवशाली आध्यात्मिक परंपरेचे प्रतीक असलेली आषाढी वारी लाखो वारकऱ्यांच्या श्रद्धा, भक्ती आणि समर्पणाचा सोहळा आहे. राज्याच्या कानाकोपऱ्यातून लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत लाखो वारकरी पायी चालत पंढरपूर येथे विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी जात असतात. या वारकऱ्यांच्या आरोग्याची योग्य काळजी घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय येथे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आषाढी वारी उपाययोजना संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक संपन्न झाली.

या बैठकीत वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसंदर्भात महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. ह.भ.प. अमित महाराज घाडगे यांनी महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत अंगीकृत रुग्णालयांच्या माध्यमातून वारकऱ्यांना अधिक व्यापक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना निवेदन दिले होते. या निवेदनाची गंभीर दखल घेत पालकमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या.

यावेळी मार्गदर्शन करताना पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले की, आषाढी वारीत सहभागी होणाऱ्या प्रत्येक



वारकऱ्याच्या आरोग्याची काळजी घेणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. पालकमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या माध्यमातून वारकऱ्यांना आवश्यक आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. वैद्यकीय सेवा अधिक परिणामकारक आणि तत्परतेने पोहोचण्यासाठी सर्व संबंधित विभागांनी समन्वयाने काम करावे. वारीदरम्यान कोणत्याही वारकऱ्याला उपचाराविना राहावे लागू नये, यासाठी आवश्यक ती सर्व व्यवस्था करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

बैठकीस जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, मनपा आयुक्त यशवंत डांगे, आयुष्यमान भारत समितीचे निमंत्रित सदस्य ह.भ.प. अमित महाराज धाडगे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी ह.भ.प. अमित महाराज घाडगे यांनी वारकऱ्यांच्या आरोग्य सेवेसंदर्भात मांडलेल्या सूचनांवर सकारात्मक चर्चा झाली. महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजनेतील सर्व अंगीकृत रुग्णालयांच्या माध्यमातून वारकऱ्यांवर उपचार करता येणार असल्याने शासकीय आरोग्य यंत्रणेवरील ताण कमी होण्यास मदत होईल. तसेच अधिकाधिक वारकऱ्यांची आरोग्य तपासणी करून आवश्यक उपचार वेळेत उपलब्ध करून देता येतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर आरोग्य, सुरक्षा, स्वच्छता आणि मूलभूत सुविधांबाबत प्रशासनाने व्यापक नियोजन सुरू केले असून वारकऱ्यांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे. ह.भ.प. अमित महाराज धाडगे यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्याला यश मिळाल्याने वारकरी संप्रदायातून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

आषाढी वारीसारख्या पवित्र धार्मिक सोहळ्यात सहभागी होणाऱ्या लाखो वारकऱ्यांना दर्जेदार आणि सुलभ आरोग्य सेवा मिळण्यासाठी प्रशासन, आरोग्य विभाग आणि विविध यंत्रणा समन्वयाने कार्यरत राहणार असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

## मान्सून लांबल्याने पेरण्या खोळंबल्या : घोरपडे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**शिराळ चिचोंडी :** मागीलवर्षाच्या तुलनेत यंदा मान्सूनच्या आगमनास उशीर झाला असल्याने शेतकरी वर्ग अडचणीत सापडला आहे जून महिन्याचा पंधरवाडा संपला असून पेरणी योग्य पाऊस न झाल्याने खरीप हंगामाच्या पेरण्या खोळब ल्याअसून शेतकऱ्या चेडोळेआता आभाळाकडे लागली आहे.

मागील वर्षी मे महिन्यात मान्सून पूर्व पावसाने चांगली हजरी लावल्याने जूनच्या पहिल्या पंधरवड्यातच बहुतांश खरीप पेरण्या पूर्ण झाल्या होत्या त्या दृष्टीने शेतकऱ्यांनी यावर्षी खरीबासाठी मशागतीची सर्व तयारी पूर्ण केली मात्र मागील वर्षाच्या तुलनेत यंदा परिस्थिती उलट होऊन जून महिना अर्धा संपला तरीही पावसाने हजेरी लावलेली नाही. त्यामुळे शेतकरी वर्ग अडचणीत सापडला आहे. भूगर्भातील पाण्याची पातळी खोल गेल्याने पाणीटंचाई निर्माण असून पाण्यावाचून पिके सुखात आहेत शेतीसाठीपाणी विहिरीत राहिले नाही पशुधन कसे वाचवावे हीच चिंता शेतकऱ्यांना पडली आहे त्यातच हवामान विभागाने मान्सूनचा वेग मांडावल्याने शेतकऱ्याने पेरणीसाठी काही करू नये असा सल्ला दिला आहे त्यामुळे सर्व बाजूने शेतकऱ्यावर संकटे निर्माण होऊन खरीप हंगामाचे गणित बिघडत चालले आहे.

अल निनो च्या सावटमुळे यावर्षी दमदार पाऊस होईल की नाही पेरणीसाठी पाऊस किती दिवस वाट बघायला लावणार या प्रश्नाने शेतकरी चिंताग्रस्त झाला आहे.



**पाण्याचा प्रश्न अवघड**

जमिनीतील पाणी पातळी खालवल्यानेपिकांना पुरेशी पाणी देणे अवघड झाले असून फळबागा व चारा पिके चुकू लागली आहेत पाऊस लवकर न पडल्यास पशुधनाच्या तसेच नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होणार आहे.

## मजबूत पक्ष बांधणी करून शहरावर शिवसेनेचा भगवा फडकवू : काळे

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** पंचवीस वर्ष अहिल्यानगरकरांनी शिवसेनेला भरभरून प्रेम दिल. शिवसेनेन शहराला आपल्या मुलासारखं जपलं. आजचा दिवस संघर्षाचा आहे. परंतु संघर्षाच्या छाताडावर नाचतो तोच खरा शिवसैनिक. दिसतं तसं नसतं. विकासाचा खोटा दिखावा उभा करून काही लोक नगरकरांना भ्रमित करत आहेत. पण अंधारातून घडवल्या जाणाऱ्या गोष्टी शहराची वाताहात करणाऱ्या आहेत. आम्ही शिवसेनेची पुन्हा मजबूत बांधणी करू. शिवसैनिक शहराच्या कानाकोपऱ्यात जाऊन पाच हजार सदस्यांच्या नोंदणीसाठी काम करतील. मजबूत पक्ष बांधणी करून अहिल्यानगरकरांच्या पाठिंब्याने आम्ही शहरावर शिवसेनेचा भगवा पुन्हा फडकवू, असा विश्वास ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी व्यक्त केला आहे.

पक्षाच्या साठाव्या वर्धापन दिनानिमित्त सदस्य नोंदणी अभियानाला जोषपूर्ण वातावरणात काळे यांच्या नेतृत्वाखाली बाजारपेठेतून सुरुवात करण्यात आली. यावेळी रावजी नांगरे, दीपक भोसले, मनोज गुंदेचा, अनिस चुडीवाला, विलास उबाळे, प्रतीक बारसे, उषा भगत, शारदा वाघमारे, मीना घाटगे, शैला लांडे, विकेश गुंदेचा, बाळासाहेब जरे, सुजय लांडे, ऋतुराज आमले, शंकर आव्हाड, गणेश आपरे, राम धोत्रे, आकाश अल्हाट, विकास भिंगारदिवे, महावीर मुथा, किशोर कोतकर, आप्पा लांडगे, विनोद शिरसाट, बाबासाहेब वैरागर, जयराम आखाडे, धनंजय देशमुख आदींसह शिवसैनिक उपस्थित होते. शहराच संपूर्ण संरक्षण आणि विकास हाच आमचा नारा आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली अहिल्यानगर मध्ये मजबूत पक्षबांधणी आम्ही करू.

## सीए परिक्षेत वेदांत मंत्री देशात २६ वा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियातर्फे घेण्यात आलेल्या आय.सी.ए.आय.मे २०२६ च्या सी.ए. अंतिम परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. या परीक्षेत अहिल्यानगरच्या वेदांत नितीन मंत्री याने देशपातळीवर २६ वा क्रमांक पटकावून शहराच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

विशेष म्हणजे, वेदांत ने हे यश पहिल्याच प्रयत्नात मिळवले आहे. सी.ए. सारखी अत्यंत कठीण मानली जाणारी परीक्षा पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण होणे हेच मोठे आव्हान असते. त्यात देशभरातील लाखो विद्यार्थ्यांमधून ३० मध्ये स्थान मिळवणे ही असामान्य कामगिरी आहे. त्याचप्रमाणे अमेरिकेच्या परीक्षेच्या दोन लेवल त्याने पहिल्याच प्रयत्नात पास केलेल्या आहेत. त्याने यापूर्वीच्या सीए इंटरमिजिएट च्या परीक्षेत भारतात बारावा क्रमांक मिळविला होता.

सीए फाउंडेशन परीक्षेत नगर शहरात दुसरा क्रमांक मिळविला होता. चि. वेदांत याने सी.ए.फाऊंडेशन, सी.ए. इंटरमिजिएट व सी.ए. फायनल तिन्ही कोर्सचे ऑनलाईन लेक्चर घरी बसून पूर्ण केले. स्वतःची जिद्द व अथक परिश्रमाने त्याने हे यश मिळवत नगरचे नाव देशपातळीवर पोहचविले. तो व्यापारी श्री रामनारायण मंत्री आणि एडीसीसी बँकेचे निवृत्त एमडी श्री आर.डी. मंत्री यांचा नातू तर व्यापारी नितीन यांचा मुलगा आहे. बीकॉम सारडा कॉलेजमधून उत्तीर्ण झालेला होता. वेदांतच्या या घवघवीत यशाबद्दल शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवर, नातेवाईक, व्यापारी आणि मित्रपरिवाराकडून त्याचे अभिनंदन केले जात आहे. त्याच्या यशामुळे अहिल्यानगरच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे. भविष्यात त्यांना कॉर्पोरेट क्षेत्रात उत्तम करिअर करण्यासाठी शुभेच्छा देण्यात येत आहेत.

## वृक्षारोपणाचे काम निघोजकरांच्या हिताचे : रसाळ

सचिन वराळ । राष्ट्र सह्याद्री

**निघोज :** वृक्ष मित्र पोपटराव रसाळ यांनी स्मशानभूमी परिसरात गेली अनेक वर्षांपासून वृक्षारोपण करुण हा परिसर निसर्गरम्य केला असून रसाळ यांचे कार्य निघोजकरांसाठी हिताचे असल्याचे प्रतिपादन संदीप पाटील वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन पाटील वराळ यांनी व्यक्त केले आहे. निघोज येथील स्मशानभूमी परिसर, दशक्रिया विधी घाट तसेच बाजारतळ या ठिकाणी शनिवार दि.२० रोजी वड,पिंपळ, कडुनिंब, जांभूळ करंज व आंबा या रोपांचे वृक्षारोपण करण्यात आले. वृक्ष मित्र पोपटराव रसाळ तसेच निघोज ग्रामस्थ व मुलिका देवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांनी यासाठी परिश्रम घेतले.

जवळपास दोनशे रोपांचे वृक्षारोपण विविध ठिकाणी करण्यात आले. वृक्ष मित्र पोपटराव रसाळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी गेली सहा ते सात वर्षांपासून या परिसरात जवळपास पाचशे पेक्षा जास्त झाडे लावीत त्याचे संवर्धन केले आहे. शनिवार रोजी झालेल्या या वृक्षारोपण कार्यक्रमास मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे प्रभाकर कवाद, संदीप वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन वराळ, वृक्ष मित्र पोपटराव रसाळ, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त संतोषशेठ रसाळ, दत्तात्रय रसाळ, राजेंद्र लाळगे, मुलिका देवी विद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी व अमोल खिलारी, मोहन कवाद, खंडू भुकन, भास्करराव कवाद, शिक्षक दारकू खोडदे, राजेंद्र भगत, रंजना दाते आदी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

संदीप वराळ जनसेवा फौंडेशनचे तालुकाध्यक्ष सचिन वराळ यावेळी म्हणाले रसाळ यांनी निघोज व परिसरात वृक्षारोपण माध्यमातून हरित क्रांती केली आहे. कोरोना काळात ऑक्सिजनची गरज सर्वांनाच होती. मात्र त्यानंतर प्रत्येकाला वृक्षारोपण किती गरजेचे आहे त्याची माहिती पोपटराव रसाळ व त्यांच्या सहकाऱ्यांच्या माध्यमातून लोकप्रबोधनातून समजली. रसाळ यांनी प्रत्यक्षात कृतीतून हजारो झाडे लावीत वृक्षसंवर्धन केले असून अशाप्रकारे प्रत्येकाने वृक्षारोपण करण्याची गरज असल्याचे सांगितले.मुलिका देवी विद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी अमोल खिलारी यांनी रसाळ यांचे कौतुक केले. वृक्ष मित्र पोपटराव रसाळ यांनी घेतलेले कार्य लोकहिताचे असून मुलिका देवी विद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने त्यांना सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही खिलारी यांनी दिली आहे.




ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांची प्रेरणा घेऊन आपण छ. संभाजीनगर येथे वृक्ष बँकेची स्थापना करुण जवळपास पंचवीस हजार वृक्ष लागवड करुण वृक्षसंवर्धन केले आहे. आपण आपल्या गावांसाठी काही तरी केले पाहिजे ही भावना ठेऊन निघोज आणी परिसरातील ग्रामस्थांच्या सहकार्याने वृक्ष बँकेची स्थापना करुन मोरवाडी, रसाळवाडी शिववाडी, निघोज स्मशानभूमी, दशक्रिया विधी घाट तसेच बाजारतळ या ठिकाणी हजारो वृक्षांची लागवड करीत लोकसहभागातून वृक्षसंवर्धन करीत आहोत. प्रतेक निघोजकर यासाठी मदत करीत आहे. हे या वृक्षसंवर्धन मोहिमेचे वैशिष्ट्य आहे.

**पोपटराव रसाळ**

# मनपा आरोग्य विभागाच्यावतीने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहात

## निरोगी जीवनासाठी योग अत्यावश्यक : डॉ. सतीश राजूरकर

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रमात आशा सेविका, सिस्टर्स आणि आरोग्य कर्मचाऱ्यांना योगाचे महत्त्व पटवून देत प्रत्यक्ष योग प्रशिक्षण देण्यात आले. कार्यक्रमात कविता खिलारी सिस्टर यांनी विविध योगासने, प्राणायाम आणि आरोग्यविषयक योगप्रकारांचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक सादर करून उपस्थितांना सुदृढ व निरोगी जीवनाचा संदेश दिला.

या कार्यक्रमास मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर, डॉ. वृषाली आरू, कविता खिलारी, विकास गीते, भाऊसाहेब सुडके यांच्यासह आशा सेविका, सिस्टर्स आणि आरोग्य विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मनपा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजूरकर म्हणाले की, आंतरराष्ट्रीय योग दिन हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता प्रत्येक नागरिकाने आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग म्हणून योगाचा स्वीकार केला पाहिजे. योगामुळे शरीर आणि मन निरोगी राहते. सध्याच्या धकाधकीच्या जीवनशैलीत तणावमुक्त आणि उत्साही राहण्यासाठी योग अत्यंत आवश्यक आहे. नियमित योगाभ्यास केल्याने शारीरिक तसेच मानसिक आरोग्य सुधारते आणि जीवन अधिक आनंदी व संतुलित बनते.

कार्यक्रमात उपस्थित आशा सेविका आणि आरोग्य कर्मचाऱ्यांनी विविध योगासनांचा सराव करत योगाचे महत्त्व जाणून घेतले. योगाच्या माध्यमातून आरोग्य संवर्धन, रोगप्रतिकारक शक्ती वाढविणे आणि निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करण्याचा संदेश देण्यात आला.

महानगरपालिका आरोग्य विभाग आणि भारतीय योग संस्था, दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या उपक्रमातून आरोग्य कर्मचाऱ्यांना योगाचे महत्त्व प्रभावीपणे पटवून देण्यात आले. कार्यक्रमामुळे उपस्थितांमध्ये योगाबाबत जागरूकता निर्माण झाली असून नियमित योगाभ्यासाचा संकल्पही अनेकांनी व्यक्त केला.




## पावसाची दांडी; पाथर्डी तालुक्यात पेरणीचे नियोजन कोलमडले

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** पावसाळा सुरू होऊन महिना उलटत आला तरी पाथर्डी तालुक्यात अद्याप समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे मृग व रोहिणी नक्षत्रात होणारी मूग, उडीद, सोयाबीन, बाजरी व कपाशीची पेरणी पूर्णपणे रखडली असून शेतकरी वर्ग चिंतेत सापडला आहे. दरवर्षी या काळात पावसाच्या भरवशावर शेतकरी पेरणीची लगबग करत असतात. यंदाही अनेकांनी कर्ज काढून महागडी बियाणे व खते खरेदी केली, तसेच मशागत करून शेती तयार ठेवली. मात्र पावसाने पाठ फिरवल्याने तयार शेतजमीन कोरडी पडली असून मशागतीवर झालेला खर्च वाया जाण्याची भीती व्यक्त होत आहे.

मूग, उडीद, बाजरी, सोयाबीन आणि कपाशी ही कमी कालावधीत येणारी व आर्थिकदृष्ट्या महत्त्वाची पिके मानली जातात. जूनच्या पहिल्या पंधरवड्यात पेरणी झाल्यास चांगले उत्पादन मिळते. मात्र पावसाअभावी पेरणीचा हंगाम पुढे ढकलला जात असून शेतकऱ्यांना पर्यायी पिकांचा विचार करावा लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी विहिरी व कूपनलिकांच्या आधारे पूर्वपेरणी केली होती. मात्र वाढत्या उष्णतेमुळे व घटत्या पाणीपातळीमुळे ती पिकेही संकटात सापडली आहेत. बहुतांश कोरडवाहू शेतकरी मात्र चातकासारखी आकाशाकडे नजर लावून पावसाची प्रतीक्षा करत आहेत. शेतकरी नेते शशीकांत क्षेत्रे म्हणाले, खते व बियाणे घरात आणून ठेवली आहेत, पण पाऊस नसल्याने ती पिशवीतच पडून आहेत. जून संपत आला तरी पावसाचा पत्ता नाही. पुढे काय करायचे, याची चिंता सतावत आहे. दरम्यान, कृषी विभागाने पुरेशी ओल झाल्याशिवाय घाईघाईने पेरणी करू नये, असा सल्ला शेतकऱ्यांना दिला आहे.



# आषाढी पालखी सोहळ्यासाठी आळंदीत पूर्वतयारीला वेग

## ३० जूनपर्यंत सर्व कामे पूर्ण करण्याचे निर्देश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी :** आषाढी यात्रा पालखी प्रस्थान सोहळा २०२६ च्या पार्श्वभूमीवर आळंदी येथे पूर्वनियोजन बैठकीत विविध विभागांना आवश्यक कामे वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या. उपविभागीय अधिकारी खेड अनिल दौंडे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक नगरपरिषद सभागृहात पार पडली. बैठकीस नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे, उपनगराध्यक्षा सुजाता तापकीर, यात्रा सभापती पूजा संजय घुंडरे, मुख्याधिकारी माधव खांडेकर, आळंदी देवस्थानचे विश्वस्त चैतन्य महाराज कबीरबूवा, पुरुषोत्तम महाराज पाटील, पोलीस प्रशासन, आरोग्य, सार्वजनिक बांधकाम, विद्युत, परिवहन, पाटबंधारे, अन्न व औषध प्रशासन तसेच विविध विभागांचे अधिकारी व लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

मुख्याधिकारी खांडेकर यांनी आषाढी वारीसाठी करण्यात येणाऱ्या नियोजनाची माहिती देताना नगरपरिषदेकडून १७ अधिकारी, २०० कर्मचारी, १५० स्वयंसेवक, पिण्याच्या पाण्यासाठी १५ टँकर्स,



२० सक्शन मशीन, अग्निशमन वाहने, रेस्क्यू बोर्ड तसेच इतर यंत्रणा उपलब्ध करून दिली जाणार असल्याचे सांगितले. यंदा वारीसाठी शहरात १८०० मोबाईल टॉयलेट आणि सार्वजनिक शौचालयांतील ६०० आसनांची व्यवस्था करण्यात येणार आहे. शहरात धूर फवारणी, स्वच्छता मोहीम, नदीघाट स्वच्छता, जलवाहिन्यांची दुरुस्ती, पाणीपुरवठा व्यवस्थापन आणि सीसीटीव्ही नियंत्रण व्यवस्था उभारण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले.

विद्युत विभागाने वारीदरम्यान अखंडित वीजपुरवठ्यासाठी विशेष नियोजन केले असून दोन स्वतंत्र उपकेंद्रांद्वारे शहराला वीजपुरवठा करण्यात येणार आहे. उर्वरित विद्युत कामे १ जुलैपूर्वी पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. आरोग्य विभागाकडून ग्रामीण रुग्णालयात अतिरिक्त बेड, ऑक्सिजन सुविधा, रुग्णवाहिका आणि वैद्यकीय पथके सज्ज ठेवण्याचे नियोजन करण्यात आले आहे. धर्मशाळा व मठांतील पाण्याच्या नमुन्यांची तपासणीही केली जाणार आहे.

पोलीस प्रशासनाकडून वारी बंदोबस्तासाठी १५० अधिकारी आणि ९९० पोलीस कर्मचारी नियुक्त करण्यात येणार असून हरवलेल्या लहान मुलांसाठी व ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र यंत्रणा उभारण्यात येणार आहे. वाहतूक व्यवस्थेसाठी विविध ठिकाणी थांबा बिंदू तसेच पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार आहे. बैठकीत लोकप्रतिनिधींनी महिलांसाठी पिंक टॉयलेट, नदीघाटावर हिरकणी कक्ष, मंदिर परिसरातील अतिक्रमण हटविणे, प्रकाशव्यवस्था, रस्ते दुरुस्ती आणि स्वच्छता यावर भर देण्याची मागणी केली. अध्यक्षीय समारोपात उपविभागीय अधिकारी अनिल दौंडे यांनी सर्व विभागांनी समन्वयाने काम करून ३० जून २०२६ पर्यंत सर्व कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच त्रुटी राहू नयेत आणि वारकऱ्यांना सुरक्षित व सुकर सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी विशेष दक्षता घेण्याचे आवाहन केले.

# दखल

## गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल पुणे विभागातील १०२ जणांना मिळणार लाभ

**पुणे :** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती घटकांतील पारंपरिक व्यवसाय करणाऱ्या गटई कामगारांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या गटई कामगारांना पत्र्याचे स्टॉल देणे या योजनेंतर्गत पुणे विभागातील पात्र लाभार्थ्यांसाठी १०२ गटई स्टॉल मंजूर करण्यात आले आहेत.

या योजनेंतर्गत पुणे विभागातील पुणे, सातारा, सांगली, सोलापूर आणि कोल्हापूर जिल्ह्यांतील अनुसूचित जाती घटकांतील चामड्याच्या वस्तू व पादत्राणे दुरुस्ती व्यवसाय करणाऱ्या पात्र गटई कामगारांना टप्प्याटप्प्याने पत्र्याचे स्टॉल उपलब्ध करुन दिले जाणार आहेत. या गटई स्टॉलमुळे लाभार्थ्यांना सुरक्षित आणि सुसज्ज व्यवसायस्थळ उपलब्ध होणार असून त्यांच्या पारंपरिक व्यवसायाला चालना मिळण्यास मदत होणार आहे. तसेच उत्पन्नवाढ, रोजगारनिर्मिती आणि आर्थिक स्वावलंबनाला बळकटी मिळण्यास हातभार लागणार आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत अनुसूचित जाती घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध कल्याणकारी योजना प्रभावीपणे राबविण्यात येत आहेत. या योजनांसाठी पात्र असलेल्या लाभार्थ्यांनी संबंधित जिल्ह्यातील सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण कार्यालयाशी संपर्क साधून योजनांचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन विभागाच्या प्रादेशिक उपआयुक्त वंदना कोचुरे यांनी केले आहे.

## वीज कनेक्शनसाठी धामणीतील शेतकऱ्यांचे उद्यापासून उपोषण

लोणी धामणी : आंबेगाव तालुक्यातील धामणी व पहाडदरा येथील शेतकऱ्यांनी डिंभेच्या उजव्या कालव्यावरून नऊ उपसा सिंचन योजना उभारल्या; मात्र वर्षभर उलटूनही शेतीपंपांना वीज कनेक्शन न मिळाल्याने शेतकऱ्यांनी २२ जूनपासून धामणी ग्राम पंचायतसमोर आमरण उपोषण करण्याचा निर्णय घेतला आहे. नऊ शेतकरी गटांनी पाणी परवाना घेऊन बँका व अन्य माध्यमांतून कर्ज उभारले. २१ मे २०२५ रोजी पाईपलाईनचे काम पूर्ण झाले असून पाईपलाईन व पंप बसवून प्रकल्प तयार आहे. मात्र महावितरणकडून वीज कनेक्शन न मिळाल्याने संपूर्ण प्रकल्प बंद पडला आहे.राज्य सरकारच्या सौरऊर्जा धोरणानुसार सोलर पंपाचा पर्याय पुढे करण्यात आला असला, तरी तो व्यवहार्य नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. प्रायोगिक तत्त्वावर राबवलेल्या सोलर योजनेत अपेक्षित ११०० लिटरऐवजी केवळ ३०० लिटर पाणी मिळाल्याने ती अपयशी ठरल्याचा दावा करण्यात आला. तसेच सोलर यंत्रणेसाठी आवश्यक जागाही उपलब्ध नसल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

या योजनांमध्ये प्रत्येकी २० ते ३० शेतकरी सहभागी असून प्रत्येकाला आठवड्यातून तीन ते चार तास पाण्याचा हिस्सा मिळतो. शेतकऱ्यांनी कर्ज, दागिने गहाण व उसनवारी करून प्रकल्प उभारला; मात्र वीजअभावी तो बंद असल्याने आर्थिक फटका बसत आहे. या संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, लोकप्रतिनिधी तसेच महावितरणकडे वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न निकाली न निघाल्याने माजी सरपंच सागर जाधव यांच्यासह १० शेतकरी २२ जूनपासून आमरण उपोषणास बसणार आहेत.

# मोबदला वितरणाला गती देण्यासाठी प्रशासनाचा पुढाकार

### पुरंदर विमानतळ प्रकल्पग्रस्तांसाठी सोमवारी विशेष कॅम्प

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

नाझरे सुपे : प्रस्तावित छत्रपती संभाजी राजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा मोबदला वेळेत मिळावा आणि महसुली तसेच न्यायिक अडथळ्यांमुळे रखडलेली प्रकरणे मार्गी लागावीत, यासाठी जिल्हा प्रशासनाने २२ जून रोजी सासवड प्रांत कार्यालयात विशेष कॅम्प आयोजित केला आहे. सकाळी ११ वाजता होणाऱ्या या कॅम्पमध्ये जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी स्वतः उपस्थित राहून प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेणार आहेत.

विमानतळ प्रकल्पासाठी संपादित जमिनींच्या मोबदला वितरण प्रक्रियेत अनेक शेतकऱ्यांच्या कागदोपत्री अडचणी समोर आल्या आहेत. वारस नोंदी, फेरफार मंजुरी, सातबारा उताऱ्यातील त्रुटी, मालकी हक्क पडताळणी, हक्कसोडपत्र, संयुक्त मालकी तसेच न्यायालयीन दावे यांसारख्या कारणांमुळे अनेक प्रकरणे प्रलंबित आहेत. या अडचणी दूर करण्यासाठी महसूल, भूमी अभिलेख, तहसील कार्यालय, प्रांत कार्यालय आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी एकाच छताखाली उपलब्ध राहणार असल्याने शेतकऱ्यांना तत्काळ मार्गदर्शन आणि निर्णय मिळणार आहे. दरम्यान, प्रकल्पासाठी आतापर्यंत सुमारे ७५ टक्के शेतकऱ्यांनी प्रतिज्ञापत्रे सादर केली असून जवळपास एक हजार कोटी रुपयांचा मोबदला वितरित करण्यात आला आहे. उर्वरित लाभार्थ्यांपर्यंतही मोबदल्याची



**प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या महसुली, न्यायिक व अर्धन्यायिक प्रकरणांचा तातडीने निपटारा करून मोबदला वितरणाला गती देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याची माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली.**

रक्कम लवकर पोहोचावी, यासाठी प्रशासनाने विशेष प्रयत्न सुरू केले आहेत. न्यायालयीन प्रक्रियेमुळे संबंधित रक्कम दीर्घकाळ अडकून राहण्याची शक्यता असल्याने शेतकऱ्यांनी प्रलंबित बाबी तातडीने निकाली काढण्यासाठी या कॅम्पचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी केले आहे. सातबारा उतारा, आठ-अ, आधार कार्ड, पॅन कार्ड, वारस नोंदी आणि इतर आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहण्याचे आवाहनही प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# सिद्धेश्वर तलाव परिसरात जुगार अड्ड्यावर पोलिसांची धाड

**आठ जणांवर गुन्हा, ३.८१ लाखांचा मुद्देमाल जप्त**




**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

सासवड : सासवड पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे जुना कोडीत रोड परिसरातील सिद्धेश्वर तलावाजवळील शेतामध्ये सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर धाड टाकून आठ जणांविरुद्ध कारवाई केली असून त्यांच्याकडून ३ लाख ८१ हजार ५७० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी सासवड पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार प्रतिबंध अधिनियम कलम १२ (अ) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक संतोष घोळवे यांना गोपनीय माहितीदारामार्फत काही व्यक्ती पैशांवर जुगार खेळत असल्याची माहिती मिळाल्यानंतर उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने शुक्रवारी (दि. १९) सायंकाळी साडेपाचच्या सुमारास सिद्धेश्वर मंदिर रोडलगत ओढ्यापलीकडील शेतामध्ये छापा टाकला. यावेळी भरत बबन मोडक (रा. वडकी), मंगेश रमेश खपर्डे (रा. उरुळी कांचन), पुरुषोत्तम गणपत जाधव (रा. सासवड), चंद्रकांत शंकर भिंताडे (रा. भिवडी), रतन आप्पा बडधे (रा. कोडीत), दत्तात्रय साहेबराव वायकर (रा. हांडेवाडी, हडपसर), निलेश बाळासाहेब जगताप (रा. सासवड) आणि निरंजन संभाजी गायकवाड (रा. वडकी) हे आठ जण गोलाकार बसून 'तीन पत्ती' हा जुगार खेळत असल्याचे आढळून आले. पोलिसांनी सर्वांना ताब्यात घेऊन त्यांच्या ताब्यातून १ लाख ४८ हजार ४१० रुपये रोख रक्कम, विविध कंपन्यांचे सहा मोबाईल फोन तसेच जुगारासाठी वापरण्यात येणारे आठ पत्त्यांचे कॅट असा एकूण ३ लाख ८१ हजार ५७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाईत पोलीस शिपाई किरण हनुमंत तुपे, महिला पोलीस उपनिरीक्षक अर्चना पाटील, पोलीस हवालदार जाधवर तसेच किवळे, लोंढे, चिले, खेंगरे आणि किर्वे यांनी सहभाग घेतला. किरण तुपे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली असून पुढील तपास महिला पोलीस उपनिरीक्षक अर्चना पाटील करीत आहेत.

# खताचा काळाबाजार व साठेबाजीवर कृषी विभागाची मोठी कारवाई

### ११३ परवान्यांवर कारवाई, ७ गुन्हे दाखल

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

पुणे : शेतकऱ्यांना दर्जेदार आणि रास्त दरात खतांचा पुरवठा व्हावा यासाठी कृषी विभागामार्फत पुणे विभागातील पुणे, अहिल्यानगर आणि सोलापूर जिल्ह्यांमध्ये खत विक्री केंद्रांची कडक तपासणी मोहीम राबविण्यात येत आहे. एप्रिल २०२६ पर्यंत विभागात नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध मोठी कारवाई करण्यात आली असून आतापर्यंत १०७ खत विक्री परवाने निलंबित आणि ६ खत विक्री परवाने रद्द करण्यात आले आहेत, तर ७ केंद्रांवर गुन्हे (एफआयआर) दाखल करण्यात आले आहेत, अशी माहिती विभागीय कृषी सहसंचालक बाबासाहेब जेजुरकर यांनी दिली आहे.

या मोहिमेअंतर्गत पुणे विभागात एकूण २ हजार ५७६ परवानाधारक केंद्रांची तपासणी करण्यात आली. तपासणी दरम्यान २८१ प्रकरणांमध्ये काळाबाजार झाल्याचे समोर आले असून, २७७ केंद्रांना 'कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. यामध्ये पुणे जिल्ह्यातील ६५० केंद्रांची तपासणी करण्यात आली. यापैकी ७१ प्रकरणांत अनियमितता आढळली असून २७ परवाने निलंबित करण्यात आले आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यात ८१२ केंद्रांची तपासणीनंतर १६ खत विक्री परवाने निलंबित आणि २ खत विक्री परवाने रद्द करण्यात आले असून ३ केंद्रांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर सोलापूर जिल्ह्यात सर्वाधिक १ हजार १२९ केंद्रांची तपासणी करण्यात आली. १८ प्रकरणांमध्ये खतांचे नमुने निकृष्ट आढळले आहेत. जिल्ह्यात एकूण ६४ परवाने निलंबित आणि ४ खत विक्री परवाने रद्द करण्यात आले असून ४ केंद्रांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याशिवाय, अनुदानित युरियाचा औद्योगिक कारणांसाठी वापर टाळण्यासाठी विभागात ४२ औद्योगिक युनिट्सना भेटी देण्यात आल्या आहेत. कृषि विभागातर्फे खतांचा काळाबाजार, कृत्रिम टंचाई, साठेबाजी आणि चढ्या दराने विक्री करणाऱ्या विक्रेत्यांवर यापुढेही कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा श्री. जेजुरकर यांनी दिला आहे. अधिकृत परवानाधारक कृषि केंद्रातूनच खत खरेदी करावे आणि काही तक्रार आल्यास नजीकच्या कृषि विभागाच्या कार्यालयास संपर्क साधण्याचे आवाहनही त्यांनी केले आहे.

कारवाईच्या वेळी पुणे अधिक्षक कृषि अधिकारी विजयकुमार राऊत, तंत्र अधिकारी निलेश गढरी, विभागीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक अतुल जाधव आदी उपस्थित होते.

# शिरूर आठवडे बाजारात पोलिसांचे विशेष पेट्रोलिंग

## वाहतूक व नियमभंग करणाऱ्यांवर कारवाई

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

**शिरूर :** शहरातील मार्केट यार्ड येथे शनिवारी (दि. २० जून) भरलेल्या आठवडे बाजारात शिरूर पोलिसांनी सकाळी १० ते ११ या वेळेत विशेष पेट्रोलिंग करून सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी व्यापक गस्त घातली. बाजार परिसरातील वाढती गर्दी, वाहतुकीचा ताण आणि चोरीच्या घटनांची शक्यता लक्षात घेऊन ही कारवाई करण्यात आली.

दर शनिवारी भरत असलेल्या शिरूरच्या आठवडे बाजारात शहरासह पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने खरेदी-विक्रीसाठी येतात. याशिवाय अहिल्यानगर जिल्ह्यातील श्रीगोंदा व पारनेर तालुक्यातील शेतकरी आणि ग्राहकही या बाजारात सहभागी होत असल्याने परिसरात मोठी वर्दळ असते. या पार्श्वभूमीवर मोबाईल चोरी, दागिने चोरी तसेच इतर मालमत्तेविरुद्धचे गुन्हे टाळण्यासाठी शिरूर



पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी बाजार परिसरात गस्त घालत परिस्थितीचा आढावा घेतला.

या वेळी पोलिसांनी शेतकरी, व्यापारी आणि नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या समस्या, सूचना व अडचणी जाणून घेतल्या. बाजार परिसरातील सुविधा, सुरक्षा आणि वाहतूक व्यवस्थेबाबत प्राप्त झालेल्या सूचना व तक्रारींची नोंद घेण्यात आली. संबंधित प्रश्नांवर उपाययोजना करण्यासाठी मार्केट यार्ड प्रशासनाला लेखी पत्र देण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

आठवडे बाजाराच्या दिवशी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याने बाजार परिसरात वाहतूक कोंडी निर्माण होते. तसेच पार्किंग व्यवस्थापनाचा प्रश्नही गंभीर होत असल्याने शिरूर नगरपालिकेशी समन्वय साधून वाहतूक नियंत्रण, पार्किंग व्यवस्था आणि नागरिकांच्या सुरक्षित हालचालींसाठी आवश्यक उपाययोजना करण्याबाबत चर्चा सुरू असल्याचेही पोलिसांकडून स्पष्ट करण्यात आले. पेट्रोलिंगनंतर पाबळ फाटा चौक आणि एस.टी. स्टँड चौक येथे नाकाबंदी करून वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करण्यात आली. या मोहिमेदरम्यान ब्लॅक फिल्म लावलेली वाहने, नंबर प्लेट नसलेली वाहने, वाहन परवाना नसलेले चालक तसेच इतर वाहतूक नियमभंग करणाऱ्यांविरोधात मोटार वाहन कायद्यानुसार कायदेशीर कारवाई करण्यात आली. शिरूर पोलिसांच्या या विशेष कारवाईमुळे बाजार परिसरातील सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट झाली असून नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. बाजाराच्या दिवशी कायदा-सुव्यवस्था, वाहतूक शिस्त आणि नागरिकांची सुरक्षितता यांना प्राधान्य देत पोलिसांनी केलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

# शैक्षणिक प्रश्नांवर मुख्याध्यापक महामंडळ आक्रमक

**प्रतिनिधी, राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** राज्यातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांसमोरील प्रलंबित प्रश्नांबाबत ठोस निर्णय घेण्याची मागणी करत महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाने शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांची भेट घेत विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. या वेळी महामंडळाचे कार्याध्यक्ष आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, राज्य सचिव तथा राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे सचिव शिवाजी कामथे तसेच महामंडळाचे इतर पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्याध्यापक, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बदल्या, वरिष्ठ वेतनश्रेणी मंजुरी, पदमान्यता, पोस्ट क्रिएट फिक्सेशन, अनुकंपा नियुक्ती,



शिक्षक व शिक्षकेतर भरती, शिक्षक भरती पोर्टलमधील अडचणी, संच मान्यता, कनिष्ठ महाविद्यालयांचे प्रश्न आणि डिजिटल प्रणालीतील त्रुटी यांसारख्या विषयांकडे निवेदनातून लक्ष वेधण्यात आले. शाळा आयडीच्या अडचणीमुळे रखडलेल्या बदली मान्यता प्रक्रिया सुलभ कराव्यात तसेच कोल्हापूर विभागातील वरिष्ठ वेतनश्रेणी मंजुरीची प्रकरणे तातडीने निकाली काढावीत, अशी मागणी करण्यात आली.

मुख्याध्यापक पदाचे संरक्षण कायम ठेवून त्या पदावरील सर्व शासकीय लाभ अबाधित ठेवावेत, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती सुरू करावी, मराठी शाळांच्या घटत्या पटसंख्येचा विचार करून संच मान्यतेचे निकष शिथिल करावेत आणि कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये दोन अर्धवेळ पदांऐवजी एक पूर्णवेळ पद मंजूर करावे, अशा मागण्यांचाही निवेदनात समावेश होता. याशिवाय ग्रंथपाल पदासाठी आवश्यक विद्यार्थी संख्या कमी करणे, अनुदानित व अंशतः अनुदानित शाळांचे प्रश्न सोडविणे तसेच २००८ नंतर अनुदानावर आलेल्या शाळांना वेतनेतर अनुदान मंजूर करावे, अशी मागणी करण्यात आली.

यावेळी आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे, प्राचार्य नंदकुमार सागर आणि शिवाजी कामथे यांनी शाळांसमोरील अडचणींचा सविस्तर आढावा शिक्षण संचालकांसमोर मांडला. त्यावर डॉ. महेश पालकर यांनी सर्व मागण्यांचा सकारात्मक विचार करून संबंधित विषयांवर नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन दिले. राज्यातील शैक्षणिक व्यवस्थेतील प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी महामंडळाचा पाठपुरावा यापुढेही सुरू राहणार असल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

द•ख•ल

## कोल्हारला तातडीने चारा छावण्या सुरु करा : पालवे

**शिराळ चिचोंडी :** पाथर्डी तालुक्यातील चिचोंडी शिराळ कोल्हार या परिसरात पाऊस नसल्याने दुष्काळी परिस्थितीमुळे पशुपालक शेतकरी अडचणीत सापडले असून या परिसरात चारा छावण्या सुरू कराव्यात अशी मागणी कोल्हार चे उपसरपंच गोरक्ष पालवे यांनी तहसीलदार कडे निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात म्हटले आहे की दुष्काळी परिस्थितीमुळे पशुपालक शेतकरी मोठ्या आर्थिक आणि सामाजिक अडचणीचा सामना करत आहेत. हिरवा व वाळलेला चारा उपलब्ध नसल्याने जनावराच्या संगोपणाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे त्यामुळेदुष्काळग्रस्त भागात त्वरित चारा छावण्या सुरू करून जनावरासाठी हिरवा आणि वाळलेला चारा उपलब्ध करून द्यावा तसेच पिण्याच्या पाण्याची नियमित व्यवस्था करावी सध्याच्या परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन सरकारने तातडीने प्रस्ताव मंजूर करून आवश्यक उपाययोजना कराव्यात अशी मागणी करण्यात आली आहे.

## मा. आ. डॉ. नरेंद्र घुले यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण



**एरंडगाव :** अहिल्यानगर येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे,मारुतरावजी घुले पाटील कला, वाणिज्य व शास्त्र महाविद्यालयात लोकनेते मारुतरावजी घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन,जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष,वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटचे विश्वस्त व महाराष्ट्र राज्य सहकारी साखर कारखाना संघाचे संचालक माजी आमदार डॉ. नरेंद्रजी घुले पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून वृक्षारोपण व उद्यान वनस्पती लागवड उपक्रम उत्साहात पार पडला. हाच महत्त्वाचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.महाविद्यालय परिसरामध्ये आयोजित या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. के. पंदरकर, उपप्राचार्य डॉ. के. आर. पिसाळ, उपप्राचार्य प्रा. पी. ए. फटांगरे, कला शाखाप्रमुख प्रा. एस. व्ही. मरकड, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. एस. बी. दहातोंडे आणि परीक्षा अधिकारी डॉ. आर. ए. नेटके यांची प्रमुख उपस्थिती होती.या प्रसंगी संगणक विज्ञान विभागातील प्रा. एस. ए. राऊत, प्रा.एस.पी.औटी मॅडम, कार्यालय अधीक्षक श्री. पी. व्ही. दळवी आणि सना शेख यांच्यासह महाविद्यालयातील इतर प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी सक्रिय सहभाग घेत वृक्षारोपण केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी श्यामा वाळके, ऋतिक ताकपेरे आणि अल्तमश शेख यांचे विशेष सहकार्य लाभले. महाविद्यालयाच्या या स्तुत्य आणि पर्यावरणपूरक उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

## भाळवणीत विविध मागण्यांसाठी उपोषण



**भाळवणी :** गेल्या आठ दिवसांपुर्वी भाळवणी ग्रामपंचायतकडे विविध मागण्यांसंदर्भात येथील सामाजिक कार्यकर्ते शिवाजी सुदाम पट्टेकर यांनी उपोषणाचे लेखी पत्र दिले होते. त्या अनुषंगाने श्री. पट्टेकर यांनी दि. २० जून २०२६ रोजी सकाळी भाळवणी येथील बाजारतळावरील ज्येष्ठ नागरिक विचार मंचच्या ओट्यावर उपोषण सुरू केले. यावेळी अनेक मान्यवरांनी उपोषण स्थळी भेट देत आपल्या प्रतिक्रिया वहीत नोंदविल्या. तसेच गावातील भजनी मंडळाच्या वतीने या उपोषणाला पाठिंबा देत सुमारे दोन तास भजनाचा कार्यक्रम आयोजित कला होता.

## शिवसेनेच्या वर्धापन दिनानिमित्त निराधार मुलांना खाऊ वाटप



**अमरापुर :** शिवसेनेच्या ६० व्या वर्धापन दिनानिमित्त शेवगाव येथील उचल फाउंडेशनमध्ये निराधार मुलांना किराणा साहित्य व खाऊचे वाटप करून सामाजिक बांधिलकी जपण्यात आली. शिवसेना नेते अरुणभाऊ मुंढे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा उपक्रम पार पडला. यावेळी अरुणभाऊ मुंढे म्हणाले की, पक्षप्रमुख तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना सर्वसामान्य, गरजू व वंचित घटकांच्या हितासाठी सातत्याने कार्यरत आहे. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा जपत समाजसेवा हेच शिवसेनेचे खरे ब्रीद असून, वर्धापन दिनानिमित्त निराधार मुलांसोबत आनंद वाटून घेणे ही शिवसेनेची सामाजिक परंपरा असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास उचल फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. संजय लड्डा, सचिन खेडकर, नगरसेवक आशुतोष डहाळे, साईनाथ आघाट, रोहित काथवटे, सालारभाई शेख, सुनील काकडे, प्रेमभाऊ जाजू, राजूभाऊ तरटे, माजी नगरसेवक दिगंबर तात्या काथवटे, अंकुश कुसळकर, विजुभाऊ धनवडे, कानिफ साखरे, अशोकराव आघाट, सुनील जगताप, अभय पालवे, विशाल आव्हाड, नानाभाऊ कर्डिले तसेच शिवसैनिक, पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. या उपक्रमामुळे निराधार मुलांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. समाजसेवा, मानवता आणि सामाजिक उत्तरदायित्वाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले.

# पाथर्डी तालुक्यात बिबट्यांचा मुक्त वावर

## नागरिकांमध्ये प्रचंड दहशत ; वनविभागाने पिंजरे लावण्याची मागणी

**अविनाश मंत्री। राष्ट्र सह्याद्री**

**पाथर्डी :** दहशत वाढली असून वनविभागा कडून याबाबत पुरेसे गांभीर्य दाखवले जात नसल्याने ग्रामीण भागातील लोकांची रात्रीची झोप गायब झाली आहे. प्रचंड दहशत व पाळीव जनावरांचे रक्षण कसे करायचे याची चिंता वाढली आहे.

गेल्या चार वर्षांपूर्वी मढी परिसरात बिबट्याने धुमाकूळ घालून एका बालिकेचा प्राण घेतला. त्यावेळी वन विभागाने मोठी यंत्रणा राबवून आठ दहा दिवसात बिबट्याला जेरबंद केले होते. तरीही एक-दोन बिबटे तालुक्याच्या डोंगराळ भागात वावरताना लोकांना आढळले होते.

सध्या तालुक्यातील मोहरी परिसरातील डोईफोडे वस्ती जवळ डोंगराळ भागात चार बिबट्यांचा वावर असून रांजणी, केळवंडी, चेकेवाडी,मढी, शिरापूर, करडवाडी,घाटशिरस, चितळी, पाडळी, मांडवे, करंजी, भोसे, लोहसर, जोड मोहोज अशा पट्ट्यामध्ये आणखी बिबट्यांचा वावर आहे. दोन दिवसांपूर्वी केळवंडी शिवारात ग्रामस्थां देखत शेतामध्ये बिबट्याने दोन शेळ्या ओढून नेल्या. एक शेळी खाऊन फस्त केली. तर दुसरी जबर जखमी केली, अशी माहिती तेथील शेतकरी महादेव आठरे यांनी दिली. माणिकदौंडी पट्ट्यातील डोंगराळ भागात रात्री अपरात्री घाटातून येणाऱ्या अनेक वाहन चालकांना बिबट्याचे



दर्शन झाले आहे. मोहरी व महिंद्रा परिसरात बिबट्याचे कुटुंब वास्तव्य असून डोंगराळ भागातील दर्या खोऱ्यांमध्ये त्यांचा मुक्काम आहे. शिकारीला निघताना संपूर्ण कुटुंबच बाहेर पडते. अलीकडील काळात डोईफोडे वस्ती व परिसरातील शेतकऱ्यांना या कुटुंबाचे दर्शन झाले आहे. दहशत व भीतीपोटी दिवसा सुद्धा या भागामध्ये समूहाने वावरावे लागते अशी परिस्थिती आहे. वन विभागाला विविध गावच्या लोकांकडून सावध केले जाते. वनविभागातील कर्मचाऱ्यांकडून मात्र सतर्क रहा, सावध रहा, कोठे आढळला तर ताबडतोब फोन करा, आम्ही येऊ असे सांगितले जाते. प्रत्यक्षात तसा अनुभव लोकांना येत नाही.

सध्या दुष्काळ सदृश परिस्थितीमुळे शेतात पीक पाणी नाही. दुभती जनावरे व शेतात साठवून ठेवलेला चारा यासाठी शेतकऱ्यांना शेतात वावरावे लागते. काही शेतकऱ्यांना विहिरींमध्ये जेमतेम पाणी आहे. त्यामुळे भाजीपाला, चारा पिके, घेतली जातात. तालुक्याच्या चितळी, पाडळी, कासार पिंपळगाव, हनुमान टाकळी या परिसरात मात्र उसाचे उभे पीक आहे. त्यामुळे त्या भागात बिबट्याचा वावर नित्याचाच झाला आहे. सायंकाळनंतर घरी येताना जीव मुठीत धरून येथील रहिवासी शेताकडे म्हणजे वस्ती कडे जातात. मढी, घाटशिरस, मायंबा, धामणगाव या पट्ट्यामध्ये भाविकांचा अहोरात्र वावर असतो. त्यांनाही रात्रीच्या वेळी बिबट्या आढळून आला आहे.

याबाबत वनविभागातील अधिकारी बबनराव मंचरे यांच्याशी संपर्क केला असता ते म्हणाले, मोहरी परिसरातील नजल वस्ती येथे पिंजरा लावला आहे. डोंगराळ व दर्या खोऱ्याचा भाग असल्याने बिबट्याचा वावर शक्य आहे. केळवंडी येथे बिबट्याच्या हल्ल्यात एक शेळी मरण पावली. त्याचा पंचनामा केला आहे. नागरिकांनी सतर्कता बाळगावी. एकट्याने निर्जन भागात वावरू नये. तेच एक दोन बिबटे या परिसरात वावरत असावेत. गावोगावी वन विभागाच्या कर्मचाऱ्यांकडून माहिती घेतली जात आहे.

## आ. घुले यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**एरंडगाव :** मा.आ.डॉ.नरेंद्रजी घुले यांच्या वाढदिवसानिमित्त जनता शिक्षण प्रसारक मंडळ शैक्षणिक संकुल शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. लोकनेते मारुतराव घुले पाटील महाविद्यालय व आनंदऋषी नेत्रालय अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने १०० रुग्णांची मोफत नेत्र तपासणी केली व गरजूंना चष्मा वाटप करण्यात आले ,प्राथमिक आरोग्य केंद्र दहिगाव-ने यांच्या सहकाऱ्यांने ५० रुग्णांचे रक्त, ईसीजी,बी पी शुगर अशा विविध तपासण्या मोफत करण्यात आली. इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश व शालेय साहित्याचे वाटप केले. गोदावरी व्हॅली पब्लिक स्कूल यांनी वाढदिवसानिमित्त विविध प्रकारच्या २० वृक्षाचे वृक्षारोपण केले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थानी राजश्रीताई घुले यांनी भुषविले अध्यक्षीय भाषणात बोलताना त्यांनी आरोग्य विषयक तपासणीचे महत्त्व सांगुन व्यायाम व आहार बाबत जागृती निर्माण करण्याचे आव्हान केले. डॉ अरुण पवार यांनी नरेंद्रजी मा. आ. घुले पाटील यांच्या एकूण सामाजिक, राजकीय, शैक्षणिक कार्याचा आढावा आपल्या मनोगतातून घेतला. यावेळी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य. सोसायटीचे चेअरमन, व्हा. चेअरमन, सदस्य समस्त ग्रामस्थ जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी के.वाय नजन संस्था समन्वयक विजयकुमार काशीद, प्रा.डॉ.शरद कोलते प्रा.डॉ.रमेश खैरे, प्रा.मकरंद बारगुजे,प्रा. शंकर काशीद, डॉ. श्रुती मांगुळकर, डॉ सुमीत शिंदे, डॉ वसंत झेंडे तसेच जनता शिक्षण प्रसारक मंडळ शैक्षणिक संकुल दहिगाव ने सर्व कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनंजय घुले यांनी केले तर आभार अमोल गुंड यांनी मांडले.

## नवजीवन माध्य. व उच्च माध्य. विद्यालयात गणवेश वाटप




**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शहरटाकळी :** शेवगाव तालुक्यातील दहिगाव ने येथील जनता शिक्षण प्रसारक मंडळ शैक्षणिक संकुल संचलित नवजीवन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय येथे मा. आ. नरेंद्रजी घुले यांच्या वाढदिवसाचे निमित्ताने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. इयत्ता पाचवी मध्ये नवीनच प्रवेश घेतलेल्या १४५ विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटपाचा कार्यक्रम राजश्रीताई चंद्रशेखर घुले यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आला. त्याप्रसंगी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी के. वाय. नजन, समन्वयक श्री काशिद, डॉ कोलते, विद्यालयाचे प्राचार्य डॉ. रमेश खैरे. उपप्राचार्य जयराम नांगरे, मच्छिंद्र पानकर, व सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते. सर्व विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाच्या वेळेस गोड जेवण देण्यात आले.

## सिस्पे फसवणूक प्रकरणात औताडे यांना दिलासा नाही

### अंतरिम जामीन फेटाळला, गुंतवणूकदारांना आशेचा किरण

**दादा सोनवणे। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** लाखाची गुंतवणूक करा आणि भरघोस परतावा मिळवा या आमिषाला भुलवून श्रीगोंदा तालुक्यातील शेकडो नागरिकांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप असलेल्या सिस-पे कंपनी प्रकरणात महत्त्वाची घडामोड घडली आहे. या प्रकरणातील प्रमुख आरोपी व कंपनीचे संचालक नवनाथ औताडे यांना जिल्हा व सत्र न्यायालयाने दिलेला तात्पुरता अंतरिम जामीन ११ जून रोजी फेटाळून लावल्याची माहिती समोर आली आहे.

या निर्णयामुळे औताडे यांच्या अटकेचा मार्ग मोकळा झाला असून तपास यंत्रणांना त्यांच्याविरुद्ध पुढील कायदेशीर कारवाई करण्यासाठी बळ मिळाले आहे. या प्रकरणात यापूर्वी श्रीगोंदा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर काही आरोपींना अटक करण्यात आली होती. सध्या ते जामिनावर बाहेर आहेत.

नवनाथ औताडे हे परदेशात असल्याची चर्चा असून त्यांच्या विरोधात रेड कॉर्नर नोटीस जारी करण्याच्या प्रक्रियेला गती मिळू शकते, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. आंतरराष्ट्रीय प्रत्यर्पण करारांतर्गत त्यांना भारतात आणण्यासाठी प्रयत्न सुरू होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, रेड कॉर्नर नोटीस किंवा प्रत्यर्पण प्रक्रियेबाबत अधिकृत यंत्रणांकडून अद्याप कोणतीही औपचारिक घोषणा करण्यात आलेली नाही.

दरम्यान, या खटल्यात सरकारी पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडण्यात सरकारी वकील केदार केसकर यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याची चर्चा गुंतवणूकदारांमध्ये आहे. न्यायालयीन कामकाजात त्यांनी घेतलेल्या परिश्रमांमुळेच अंतरिम जामीन अर्ज फेटाळला गेल्याचा दावा काही गुंतवणूकदारांनी केला आहे. प्रकरणातील कारवाईचे श्रेय घेण्याचा प्रयत्न काहींकडून होत असल्याचीही चर्चा असून, न्यायालयीन लढाईत सरकारी वकील केदार केसकर यांच्या प्रयत्नांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या अफवा किंवा गैरप्रचाराला बळी पडू नये, असे मत अनेक फसवणूकग्रस्त गुंतवणूकदारांनी व्यक्त केले. सिस-पे प्रकरणातील पुढील घडामोडींवर आता फसवणूकग्रस्त गुंतवणूकदारांचे लक्ष लागले असून मुख्य आरोपी भारतात आणण्याच्या प्रक्रियेला किती वेग येतो, याकडे सर्वांचे लक्ष आहे.

## बेलवंडी जि.प. केंद्र शाळेसाठी २० संगणकांची अत्याधुनिक लॅब

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील जिल्हा परिषद सेमी इंग्लिश प्राथमिक शाळा, बेलवंडी बुद्रुक या शाळेस शासनाकडून २० संगणकांची अत्याधुनिक कॉम्प्युटर लॅब मंजूर झाली आहे. जुलै महिन्यापासून ही लॅब सुरू होणार असून विद्यार्थ्यांना मोफत संगणक शिक्षणाची सुविधा उपलब्ध होणार असल्याची माहिती शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल लोखंडे यांनी दिली.

गुणवत्तापूर्ण शिक्षणामुळे शाळेची पटसंख्या सातत्याने वाढत असून चालू शैक्षणिक वर्षात २०० हून अधिक विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

शाळेत डिजिटल क्लासरूम, शिष्यवृत्ती पूर्वतयारी वर्ग, क्रीडा व विविध गुणदर्शन उपक्रम राबविण्यात येतात. शाळा व्यवस्थापन समितीने बेलवंडी परिसरातील पालकांना पाल्यांचा प्रवेश जिल्हा परिषद सेमी इंग्लिश शाळेत घेण्याचे आवाहन केले आहे.

## म्हसणे गावचे सुपुत्र शिवदास गुंड भूमी अभिलेख अधीक्षक

**सुपा :** पारनेर तालुक्यातील म्हसणे गावचे सुपुत्र तथा कर्तव्यनिष्ठ अधिकारी शिवदासजी गुंड यांची महाराष्ट्र राज्य भूमी अभिलेख विभाग, मुंबई येथे अधीक्षकपदी नियुक्ती झाल्याबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. प्रशासकीय सेवेत उत्कृष्ट कामगिरी, प्रामाणिकपणा आणि कार्यतत्परतेच्या जोरावर शिवदास गुंड यांनी ही महत्त्वाची जबाबदारी मिळविली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे म्हसणे गावासह संपूर्ण पारनेर तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला असून ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. म्हसणे गावचे सरपंच डॉ. विलास काळे यांनी गुंड यांचे अभिनंदन करताना सांगितले की, शिवदास गुंड हे गावाचे आदर्श व्यक्तिमत्त्व असून त्यांच्या यशामुळे युवकांना नवी प्रेरणा मिळाली आहे. शिवदास गुंड यांच्या या यशाबद्दल ग्रामस्थ, मित्रपरिवार, सामाजिक संस्था तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. भारतीय जनता राहुल शिंदे, दत्तानाना पवार, अनिल तरटे, पंकज कारखीले, सुरेश बोरुडे, अजिंक्यतारा दरेकर, नितीन बागल , नामदेव गुंड , बापूसाहेब बारहाते विलास तरटे त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

**म्हसणेच्या सुपुत्राचा मान; गावाचा अभिमान वाढविला**

महाराष्ट्र राज्य भूमी अभिलेख विभागात अधीक्षकपदी निवड होऊन शिवदास गुंड यांनी म्हसणे-सुलतानपूर परिसराचे नाव राज्यस्तरावर उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल म्हसणे-सुलतानपूरचे सरपंच डॉ. विलास काळे यांनी त्यांचे अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. शिवदास गुंड यांच्या निवडीमुळे गावातील युवकांना नवी प्रेरणा मिळाली असून संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या कर्तृत्वामुळे म्हसणे गावाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

**डॉ. विलास काळे**
**सरपंच**

# उत्पादन दिनांक नसलेला चहा बाजारात!

## ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ

**दादा सोनवणे। राष्ट्र सह्याद्री**

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा शहरातील काही किराणा दुकानांमध्ये विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या चहाच्या पॅकेटवर उत्पादन दिनांक आणि एक्सपायरी दिनांक स्पष्टपणे नमूद नसल्याचा प्रकार समोर आला आहे. त्यामुळे ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ केला जात असल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू झाली आहे.

समोर आलेल्या चहाच्या पॅकेटवर केशरी आसाम चहा असे नाव असून, पॅकेटवर इशीीं इशर्षेीश १ धशरी ीी झरलज्ञरसळपस पॅकिंग पासून एक वर्ष पर्यंत वापरासाठी योग्य असा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र, नेमके पॅकिंग कोणत्या दिवशी करण्यात आले याची तारीख स्पष्टपणे छापलेली दिसत नाही. तसेच बॅच नंबर एम आणि वाय पॅकेड यासाठी जागा राखीव ठेवण्यात आली असली तरी त्यावर कोणतीही माहिती नमूद नसल्याचे दिसून येत आहे. सदर पॅकेटवर नेट वजन १ किलो, एमआरपी ३२० रुपये असा उल्लेख करण्यात आला आहे. तसेच पॅकेजिंग करणाऱ्या कंपनीचे नाव च/ी. डहरीींपवशी गरज्ञहेींळूर उे., दालमंडी, अहमदनगर आणि एफएसएसएआय क्रमांकही छापण्यात आला आहे. मात्र, ग्राहकांना उत्पादनाची वैधता तपासण्यासाठी आवश्यक असलेली माहिती नसल्याने या उत्पादनाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अन्न सुरक्षा व मानके कायद्यानुसार खाद्यपदार्थांच्या पॅकेजिंगवर उत्पादन दिनांक, बॅच क्रमांक, वापरण्याची अंतिम मुदत अथवा 'बेस्ट बिफोर' कालावधीसंदर्भातील आवश्यक माहिती देणे बंधनकारक आहे. श्रीगोंदा शहरासह तालुक्यातील विविध किराणा दुकानांमध्ये अशा प्रकारच्या उत्पादनांची विक्री होत असल्यास संबंधित विभागाने विशेष तपासणी मोहीम राबवून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी ग्राहकांनी व्यक्त केली




आहे. ग्राहकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर असल्याने अन्न सुरक्षा विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे मत नागरिकांमधून व्यक्त होत आहे. दरम्यान, संबंधित उत्पादनाच्या पॅकेटवरील उत्पादन दिनांक आणि एक्सपायरीची माहिती उपलब्ध नसल्याने ग्राहकांनीही खाद्यपदार्थ खरेदी करताना पॅकेजवरील सर्व माहिती तपासूनच खरेदी करावी, असे आवाहन ग्राहक संघटनांकडून करण्यात येत आहे.

**याची रीतसर तक्रार करा कारवाई करू - आयुक्त अन्न सुरक्षा अहिल्यानगर**

श्रीगोंद्यातील दुकानांमध्ये केसरी आसाम चहा या नावाची चहापत्तीचे आढळून आले असून या पॅकेजवर कोणत्याही प्रकारचा उत्पादन समाप्ती वापरण्यास योग्य अशी कोणतीही नोंद नसल्याचे आढळून आल्यावर याबाबत अहिल्यानगर अन्नसुरक्षा आयुक्त सोपान इंगळे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की तक्रार करा त्यांच्यावर रीतसर कारवाई केली जाईल

**आम्ही तुम्हास विनंती करतो तक्रार करू नका ?**

याबाबत पॅकेजिंग करणारे श्यामसुंदर जकोटिया कंपनी अहिल्यानगरच्या ग्राहक क्रमांकवर फोन केला असता त्यांनी सांगितले की आम्ही विनंती करतो कृपया याबाबत कुठेही तक्रार करू नका यावरून या मालाची गुणवत्ता लक्षात येत असून नागरिकांच्या जीवनाशी खेळण्याचा अधिकारी यांना कोणी दिला याचाही शोध घेण्याची गरज निर्माण झाली आहे

**अन्न सुरक्षा विभागावर आमचा विस्वास नाही त्यामुळे ग्राहक मंचाकडेही जाणार ?**

आम्ही याबाबत अनेकदा अन्नसुरक्षा अधिकारी यांच्याकडे फोनवरून तक्रारी केल्या मात्र त्यांच्यावर कोणतीही कारवाई झाली नाही त्यामुळे अन्नसुरक्षा अधिकारी आणि चहाचे व्यापारी यांची मिली बघत असण्याची शक्यता नाकारता येत नाही त्यामुळे याबाबत ग्राहक मंचातही दाद मागणार असल्याचे एका सजग नागरिकांनी बोलताना सांगितले आहे.

# दैनिक राष्ट्र सह्याद्री



## किराणा दुकानातील तंबाखूजन्य पदार्थ पोलिसांकडून जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** प्रतिनिधी पोलीस ठाण्याच्या ताहराबाद बीट हद्दीत अवैध धंद्यां विरोधात सुरू असलेल्या कारवाई दरम्यान निंभेरे येथील एका किराणा दुकानावर छापा टाकून तंबाखूजन्य पदार्थ जप्त करण्यात आले. पोलीसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, पोलीस कर्मचारी आर. एम. सानप यांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, निंभेरे येथील 'गुडलक किराणा' दुकानामध्ये तंबाखूजन्य पदार्थांची विक्री केली जात आहे. या माहितीची खात्री करून दोन पंचांच्या उपस्थितीत दि. १८ जून रोजी सायंकाळी सुमारे ४.४५ वाजता संबंधित दुकानावर छापा टाकण्यात आला. यावेळी दुकान चालक शाहिद फत्तु पठाण (वय २९ वर्षे, रा. निंभेरे, ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) हा तंबाखूजन्य पदार्थ विक्री करताना आढळून आला. दुकानाची झडती घेतली असता १२० रुपये किमतीच्या 'गाय छाप' तंबाखूच्या १२ पुड्या जप्त करण्यात आल्या. जप्त मुद्देमालाचा पंचनामा करून तो ताब्यात घेण्यात आला. शालेय विद्यार्थी ये-जा करीत असलेल्या परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री केल्या प्रकरणी आरोपी शाहिद पठाण याच्या विरुद्ध सिगारेट व अन्य तंबाखूजन्य पदार्थ अधिनियम २००३ अंतर्गत कलम ६(ब) व २४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत राहुरी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ७०७/ २०२६ नोंदविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

## अवैध मुरूम व पोयट्याची खुलेआम तस्करी

### वनविभागाचे रक्षकच झाले भक्षक

अशोक दुशिंग | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** कोपरगाव तालुका हद्दीतून जाणाऱ्या समृद्धी महामार्गाच्या कामामुळे मुरूम-पोयटा व दगडाला मोठी मागणी आहे. याचा फायदा घेऊन दिवस रात्र राखीव वनक्षेत्रातून अवैध उत्खनन करून ट्रॅक्टर-डंपरच्या सहाय्याने राखीव वनक्षेत्रातून व कुरण क्षेत्रातून मोठ्या प्रमाणात मुरूम पोयटा व दगडाचे अवैध उत्खनन केले जात आहे जेसीबी व ट्रॅक्टर-डंपरच्या साहाय्याने हे मुरूम बाहेर नेले जात असून शासनाचा कोट्यावधी चा महसूल प्रमाणात बुडत आहे यामुळे पर्यावरणाची मोठ्या प्रमाणात हानी होत असूनही वनपरिक्षेत्र अधिकारी याकडे दुर्लक्ष करत असल्याचे आरोप नागरिकां मधून होत आहे.

कोपरगाव तालुक्यातील पूर्व भागातील संवत्सर ,सडे बंधारा व कोकमठाण या गोदावरी नदीच्या पट्ट्यामध्ये वन विभागाचे राखीव वनक्षेत्र मोठ्या प्रमाणात असून या ठिकाणी मोठ्या प्रमाणामध्ये मुरूम पोयटा उत्खनन होऊन राखीव वनांचे व पर्यावरणाचे नुकसान होत असल्याच्या तक्रारी अनेक वनप्रेमी व वृक्ष मित्रांनी केल्या असून याकडे जाणीवपूर्वक वन अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत असल्याचे नागरिकांचे मत आहे. या राखीवनातून होणाऱ्या तस्करीला वेळी आळा घातला नाही तर राखीव वन हे लवकरच नेस्तनाभूत झाल्याशिवाय राहणार नाही राखीव वन हे पुढच्या पिढ्यांची नैसर्गिक संपत्ती आहे परंतु काही भ्रष्ट वन कर्मचाऱ्यांमुळे संपूर्ण यंत्रणेवर डाग लागत आहे.

अनेक प्रामाणिक वनाधिकारी वृक्षांचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी आपले जीव धोक्यात घालून जंगलाचे रक्षण करत आहेत तरी अवैध तस्करी रोखण्यासाठी जिल्हा उपवनसंरक्षक काय पायबंद घालतील याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागून राहिले आहे.



#### रक्षकच झाले भक्षक

राखीव वनातून होणारी तस्करी रोखण्याकरिता स्थानिक पातळीवर अनेक वेळा तक्रार करूनही ठोस कारवाई होत नाही रक्षकच भक्षक होत असल्याचा स्थानिकांचा आरोप असतो की वनविभागाचे काही कर्मचारी 'अर्थ पूर्ण' तडजोडी करून अवैध उत्खननाकडे दुर्लक्ष करतात. मनुष्यबळ कमी आणि क्षेत्र मोठे असल्याने प्रत्येक ठिकाणी गस्त पोहोचत नाही, याचा गैरफायदा घेऊन तस्करी वाढत असल्याने या तस्करीला आळा बसत नाही तरी रात्रीच्या वेळ गस्त वाढवावी अशी वृक्षमित्र व प्राणी मित्र यांची मागणी आहे.

## मागील वादातून महिलेला मारहाण

### विनयभंग प्रकरणी पाच जणांवर गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** तालुक्यातील उंबरे परिसरात मागील भांडणाचा राग मनात धरून एका ४५ वर्षीय महिलेच्या घरात घुसून मारहाण व विनयभंग केल्याची घटना १९ जून रोजी घडली. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी सुमारे ८ वाजता महिलेचा मुलगा कामावर जात असताना आरोपींशी त्याचा किरकोळ वाद झाला होता. गावातील नागरिकांनी मध्यस्थी करत हा वाद मिटविला. मात्र, त्यानंतर महिला घरी एकटी असताना आरोपी तिच्या घरी गेले. त्यांनी शिवीगाळ करत मुलाबाबत विचारणा केली आणि त्याला जिवंत सोडणार नसल्याची धमकी दिली. महिलेने विचारणा केल्यावर आरोपींनी तिला लाकडी दांड्याने मारहाण केली तसेच तिचा विनयभंग केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे.

महिलेने आरडाओरडा केल्यानंतर तिचा भाऊ व पुतण्या मदतीसाठी धावून आले. त्यांनाही लोखंडी रॉड व लाकडी दांड्याने मारहाण करण्यात आली. या घटनेत दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी आकाश उर्फ राजू सिताराम नानेकर, रोहन योगेश ढोकणे, योगेश रामभाऊ ढोकणे, महेश जालिंदर ढोकणे आणि विशाल दत्तात्रय ढोकणे (सर्व रा. उंबरे, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार सुनील निकम करीत आहेत.

## किरकोळ कारणातून दोघा भावांना मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**राहुरी :** राहुरी तालुक्यातील वरशिंदे येथे किरकोळ कारणावरून दोघा भावांना लोखंडी गज, लाकडी काठी व लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याची घटना १७ जून रोजी घडली. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विरेश केशव विधाते (वय ३८, रा. वरशिंदे शिवार) हे गावात कामानिमित्त गेले होते. काम न मिळाल्याने ते जुन्या घरासमोरील रस्त्याने पायी घरी परतत असताना आरोपींनी त्यांना अडविले. तू आमच्या वडिलांसोबत का फिरतो? असा जाब विचारत शिवीगाळ केली. यानंतर झालेल्या वादातून आरोपींनी विरेश विधाते यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली.

आरडाओरड ऐकून त्यांचे मोठे बंधू सुरेश केशव विधाते हे मध्यस्थी करण्यासाठी आले असता आरोपींनी त्यांनाही लोखंडी गज व लाकडी काठीने मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकरणी विरेश विधाते यांच्या फिर्यादीवरून विनोद शिवाजी विधाते व सोनू शिवाजी विधाते (दोघे रा. वरशिंदे, ता. राहुरी) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

## ढवळगाव शिवारात गावठी कट्टा व जिवंत काडतुसे जप्त

### दोघे अटकेत, एक फरार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**बेलवंडी :** श्रीगोंदा तालुक्यातील ढवळगाव शिवारात बेकायदेशीर शस्त्र विक्रीसाठी आलेल्या दोन सराईत गुन्हेगारांना बेलवंडी पोलिसांनी सापळा रचून अटक केली. या कारवाईत एक देशी बनावटीचा गावठी कट्टा, मॅगझिन आणि दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. तर एक आरोपी पोलिसांना चकवा देत फरार झाला आहे. अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये सचिन विलास शिंदे (रा. निंबवी, ता. श्रीगोंदा) आणि दीपक सीताराम शिंदे (रा. ढवळगाव, ता. श्रीगोंदा) यांचा समावेश आहे.

तर तुषार उर्फ नाना तांबे हा आरोपी घटनास्थळावरून फरार झाला असून त्याचा शोध सुरू आहे. पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, १९ जून रोजी ढवळगाव शिवारातील 'हॉटेल रिलॅक्स'च्या पाठीमागे काही जण घातक शस्त्रांसह येणार असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी परिसरात सापळा रचला. पोलिसांची चाहूल लागताच आरोपींनी पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी पाठलाग करून सचिन शिंदे आणि दीपक शिंदे यांना ताब्यात घेतले. झडतीदरम्यान सचिन शिंदे याच्याकडून विनापरवाना गावठी कट्टा व मॅगझिन, तर दीपक शिंदे याच्याकडून दोन जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल दादासाहेब क्षीरसागर यांच्या फिर्यादीवरून बेलवंडी पोलीस ठाण्यात शस्त्र अधिनियम कलम ३, ७, २५ व २७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अप्पर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी शिरीष वमने यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर, भाऊसाहेब यमगर, धर्मराज दहिफळे, संदीप गवारे, शरद गांगर्डे तसेच पोलीस अंमलदार व होमगार्ड पथकाने ही यशस्वी कारवाई पार पाडली.

फरार आरोपीचा शोध घेण्याबरोबरच जप्त करण्यात आलेल्या शस्त्रांचा वापर कोणत्या उद्देशाने केला जाणार होता, याचा सखोल तपास पोलीस करीत आहेत.

## चोरीच्या वाहनांसाठी शोध मोहीम | चार दिवसात १८७ वाहनांवर कारवाई

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** चोरीच्या दुचाकी वाहनांचा माग काढण्यासाठी आणि विना नंबर प्लेट फिरणाऱ्या वाहनांवर लगाम घालण्यासाठी श्रीगोंदा पोलिसांनी राबविलेल्या विशेष मोहिमेत अवघ्या चार दिवसांत १८७ वाहनांवर कारवाई करत तब्बल ३ लाख ५० हजार ५०० रुपयांचा दंड वसूल केला आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे काही आरोपी चोरीच्या दुचाकी वाहनांवरील नंबर प्लेट काढून त्यांचा वापर गुन्ह्यांसाठी करत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार १७ जून ते २० जून दरम्यान श्रीगोंदा शहर आणि परिसरात विशेष तपासणी मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान विना नंबर प्लेट आढळलेल्या १८७ दुचाकी वाहने पोलीस ठाण्यात आणून त्यांची सखोल पडताळणी करण्यात आली. वाहनांची आरसी बुक, इंजिन नंबर, चेसीस नंबर आणि इतर कागदपत्रांची तपासणी करून वाहन मालकांची खातरजमा करण्यात आली. त्यानंतर वाहनांना जागीच नंबर प्लेट बसवून दंडात्मक कारवाई केल्यानंतर १६९ वाहने सोडण्यात आली, तर १८ वाहनधारकांनी आवश्यक कागदपत्रे सादर न केल्याने ती वाहने पोलीस ठाण्यात जमा करण्यात आली आहेत.

एकूण १८७ वाहनांवर कारवाई करून ३,५०,५०० रुपयांचा दंड आकारण्यात आला. दरम्यान पोलीस प्रशासनाने नागरिकांना आवाहन केले आहे की, वाहनांच्या पुढील व मागील बाजूस अधिकृत नंबर प्लेट लावणे बंधनकारक आहे. ज्या वाहनांवर नंबर प्लेट नसतील, त्यांच्यावर पुढील काळातही कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

ही मोहीम पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलूबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे आणि पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन लिमकर, पोहेकॉ अभय काळे, पोकॉ आजिनाथ जाधव, पोकॉ गोरख जाधव तसेच होमगार्ड पथकाने यशस्वीपणे राबविली.

#### नंबर प्लेट नसलेले वाहन रस्त्यावर चालणार नाही

चोरीच्या वाहनांचा शोध घेण्यासाठी श्रीगोंदा पोलिसांनी सुरू केलेली मोहीम पुढेही सुरू राहणार असून वाहनधारकांनी तातडीने अधिकृत नंबर प्लेट बसवून वाहनांची कागदपत्रे अद्ययावत ठेवावीत, अन्यथा कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा पोलिसांनी दिला.

## कासमपीर दर्ग्यात चोरी

### दानपेटी फोडून रोख रक्कम व चांदीचे घोडे लंपास

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**सोनई :** नेवासा तालुक्यातील वांजोळी रोड परिसरातील कासमपीर दर्ग्यात दानपेटी फोडून रोख रक्कम व चांदीचे घोडे चोरून नेल्याची घटना घडली असून याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चोरीमुळे परिसरात खळबळ उडाली असून धार्मिक स्थळांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वांजोळी येथील शेतकरी रमजुद्दीन मकबूल सय्यद (वय ५२) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. दिनांक २० जून रोजी पहाटे सुमारे १ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

फिर्यादीनुसार, आरोपीने दर्ग्यातील कपाटाचे दरवाजे तोडून दानपेटी फोडली. त्यामधील १० हजार रुपये रोख रक्कम तसेच कपाटात ठेवलेले सुमारे ४० हजार रुपये किमतीचे चांदीचे ४० घोडे चोरून नेल्याचा आरोप आहे. या चोरीत एकूण ५० हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास झाल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच सोनई पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. या प्रकरणी मच्छिंद्र नामदेव डोळे (वय ४०, रा. वजारवाडी, ता. नेवासा) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) अन्वये गुन्हा क्रमांक २७६/२०२६ दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस कर्मचारी चौधरी करीत आहेत. दरम्यान, धार्मिक स्थळांवरील वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर दर्गा व अन्य धार्मिक स्थळांवर सुरक्षा व्यवस्था अधिक मजबूत करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## गळफास घेऊन एकाची आत्महत्या

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी :** राहुरी तालुक्यातील तांभेरे येथील शेलार वस्तीवर राहणाऱ्या ४५ वर्षीय व्यक्तीने आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शनिवारी (दि. २० जून) सकाळी उघडकीस आली. सुनील शहाजी शेलार (वय ४५) असे आत्महत्या केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. शनिवारी सकाळच्या सुमारास ग्रामस्थांना शेलार वस्ती परिसरातील आंब्याच्या झाडाला दोरीच्या साहाय्याने एक व्यक्ती लटकलेल्या अवस्थेत दिसून आली.

जवळ जाऊन पाहणी केली असता तो मृतदेह सुनील शेलार यांचा असल्याचे निष्पन्न झाले. याबाबतची माहिती तात्काळ त्यांच्या कुटुंबीयांना देण्यात आली. घटनेची माहिती मिळताच कुटुंबीयांनी घटनास्थळी धाव घेतली. आई, पत्नी, मुलगा व मुलीने केलेला आक्रोश पाहून उपस्थित नागरिकही भावुक झाले. काही दिवसांपूर्वीच सुनील शेलार यांच्या वडिलांचे निधन झाले होते. त्यानंतर कुटुंबातील कर्त्या व्यक्तीने असे टोकाचे पाऊल उचलल्याने कुटुंबावर मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून पोलिसांकडून त्याबाबत तपास सुरू आहे.

घटनेची माहिती मिळताच राहुरी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत मृतदेह ताब्यात घेतला. शवविच्छेदनासाठी मृतदेह पाठविण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. मृत सुनील शेलार यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, एक मुलगी व आई असा परिवार आहे. त्यांच्या अकाली निधनामुळे तांभेरे व परिसरात शोक व्यक्त केला जात आहे. याप्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

## अवैध गौणखनिज वाहतुकीवर कारवाई

### २५ लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री




**वैजापूर :** अवैध गौण खनिज वाहतुकी विरोधात कारवाई करत वैजापूर पोलिसांनी सुमारे २५ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. लाडगाव चौफुली परिसरात शनिवारी ही कारवाई करण्यात आली. पोलिसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीनुसार मुंबई-नागपूर महामार्गावरून एका हायवामधून अवैधरित्या मुरूम वाहतूक होत असल्याचे समजले. त्यानुसार पोलिसांनी लाडगाव चौफुली येथे सापळा रचला. दरम्यान माहितीतील हायवा (क्रमांक एमएच २० जीसी २२८८) समोरून येताना दिसताच पोलिसांनी चालकास वाहन थांबविण्याचा इशारा केला.

मात्र पोलिसांना पाहताच चालकाने वाहन रस्त्याच्या कडेला उभे करून घटनास्थळावरून पळ काढला. पोलिसांनी वाहनाची तपासणी केली असता वाहनात ६ ब्रास मुरूम आढळून आला. मुरूम वाहतुकीसाठी आवश्यक परवाना अथवा कागदपत्रे उपलब्ध नसल्याने वाहनासह मुरूम जप्त करण्यात आला.

या कारवाईत सुमारे २५ लाख रुपये किमतीचा हायवा व १२ हजार रुपये किंमतीचा मुरूम असा एकूण २५ लाख १२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी अंमलदार अमोल कांबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## लग्न जुळवण्याच्या बहाण्याने फसवणूक

### खंडणी मागणाऱ्या तीन महिला जेरबंद | राहाता पोलीसांची कारवाई

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी :** सध्या मुलामुलींचे लग्न जमवून देताना मोठ्या प्रमाणात फसवणूकीचे प्रमाण वाढले असून लग्न जमविण्याच्या बहाण्याने पुणे जिल्ह्यातील बारामती येथील तरुणाची फसवणूकीचा प्रकार राहाता येथे घडला असून, पोलिसांनी तीन महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून अटक करण्यात आली. सदर गुन्हयातील तक्रारदार फिर्यादी (वय ३०, रा. बारामती, जि.पुणे) हा शेतकरी असून विवाहासाठी मुलगी शोधत होता.त्या अनुषंगाने मध्यस्थीमार्फत त्याचा संपर्क रेश्मा केशव काटे (रा.नऱ्हे,ता.आंबेगाव, जि.पुणे ) हिच्याशी झाला. त्यावेळी, रेश्मा काटे हिने विवाहासाठी पुणे येथे मुली आहेत परंतु सदर मुलींची अपेक्षा जास्त आहेत.

असे सांगून तिचे ओळखीची मंगल अंकुश पठारे (रा.साकुरी शिवार, ता. राहाता,) हिचेकडे विवाहाकरीता मुलगी आहे असे, सांगून तक्रारदाराचा विश्वास संपादन केला व राहाता येथे लग्नासाठी मुलगी दाखवण्याच्या बहाण्याने त्याच्याकडून सुरुवातीला ऑनलाईन पद्धतीने १२,५०० रुपये घेतले. (दि.१९) जून रोजी तक्रारदार, त्याचा भाऊ व मित्रांना मुलगी पाहण्यासाठी राहाता येथील साकुरी शिवार, गोदावरी वसाहत येथील मंगल पठारे हिच्या घरी बोलावून घेतले.



तेथे आरोपी महिलांनी सुगंधा कैलास गायकवाड, (रा. साकुरी शिवार,ता.राहाता) येथे मुलगी दाखवली.त्यावेळी तक्रारदारांनी मुलीच्या कुटुंबाबाबत विचारणा केली असता तीला आई नाही वडील आहेत परंतु ते दारु पितात तिचे सर्व कार्य आम्हीच करणार आहोत, असे सांगीतले. त्यामुळे तक्रारदार लग्न करण्यास तयार झाले व त्यांनी कायदेशीररीत्या 'कोर्ट मॅरेज' करण्याची मागणी केली, त्यावेळी मंगल अंकुश पठारे, रेश्मा केशव काटे, सुगंधा कैलास गायकवाड यांनी आपण घरातच लग्न लावुन घेवु तुम्ही दोन लाख तीस हजार रुपये आम्हाला दया व मुलगी आत्ताच घेवुन जा असे म्हणाल्याने तक्रारदार यांना त्यांचा संशय आला त्यामुळे तक्रारदार याचे मित्र बाहेरुन चक्कर मारुन येतो म्हणुन घराबाहेर पडले. तेव्हा रेश्मा काटे हिने लगेच निर्णय घ्या व लग्न लावून घ्या नाहीतर मला येथे येण्याचे व मुलगी दाखवण्याचे पैसे दया असे म्हणाली. त्यावेळी तक्रारदार यांनी आमचे लोक पैसे आणण्यासाठी बाहेर गेले आहेत तसेच तक्रारदार यांनी कायदेशीररीत्या 'कोर्ट मॅरेज' करण्याची मागणी केली असता याचा राग येऊन आरोपी महिलांनी फिर्यादी व त्याच्या मित्राला घरात डांबून ठेवले.

तसेच बाहेर गेलेल्या त्यांचे मित्र नातेवाईकांना फोन करून दोन लाख तीस हजार रुपयांची खंडणी द्या, तरच तुमच्या लोकांना सोडू, अशी धमकी दिली, त्यावेळी फिर्यादीचे बाहेर गेलेले नातेवाईक व मित्र यांनी राहाता पोलीस स्टेशन यांची मदत घेवुन तात्काळ साकुरी शिवार, गोदावरी वसाहत येथील मंगल पठारे हिच्या घरी यांचे घरी जावुन तक्रारदार व त्यांचे मित्राची तात्काळ सुटका केली.

#### राहाता पोलीस स्टेशन येथे येवून आरोपीविरुद्ध

राहाता पोलीस स्टेशन येथे फसवणूक व खंडणीचा गुन्हा दाखल करण्यात आला असून सदर तीनही महीला आरोपी यांना अटक करण्यात आल्या आहेत. गुन्हयातील आरोपी रेश्मा केशव काटे (रा.नन्हें, ता. आंबेगाव, जि. पुणे) मंगल अंकुश पठारे (रा. साकुरी शिवार, ता. राहाता, जि. अहिल्यानगर) सुगंधा कैलास गायकवाड, (रा. साकुरी शिवार, ता.राहाता, जि. अहिल्यानगर) यांनी संगनमत करून हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलीस पुढील तपास राहाता पोलीस स्टेशन हे करत आहेत.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक मुम्मका एम सुदर्शन,अपर पोलीस अधीक्षक श्रीरामपूर सोमनाथ वाकचौरे उपविभागीय पोलीस अधिकारी, अमोल भारती यांचे मार्गदर्शनाखाली राहाता पोलीस स्टेशनचे पो. नि. दिपक सरोदे, म.पो.स.ई. कोमल कुमावत, पो.हे.कॉ. धीरज अभंग, म.पो.कॉ. विरटे, यांनी केली आहे.

#### पोलिसांचे आवाहन

जर या महिला गुन्हेगारांच्या टोळीने लग्नाच्या बहाण्याने कोणाला फसवले असल्यास अशा तक्रारदारांनी समोर येऊन राहाता पोलीस स्टेशन या ठिकाणी गुन्हा नोंदवावा असे आवाहन अपर पोलीस प्रशासनाकडून सांगण्यात आले.